शिक्षण / आरोग्य / रोजगार / कला /क्रीडा / महिला सक्षमीकरण

# रयत विद्यार्थी विचार मंच

संस्थापक / अध्यक्ष : धम्मराज साळवे

➢ **कार्यअहवाल : सन २०२२**

देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष झाल्यानंतर देखील आजही एक मोठा वर्ग शिक्षणापासून वंचित आहे.अनेक विद्यार्थी आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षण अर्ध्यावर सोडतात. मराठवाड्यातील एका विद्यार्थीनीने बस पास साठी २५० रूपये नाहीत म्हणून आत्महत्या केली. अनेक विद्यार्थी आपल्या शिक्षणाचे ओझे पालकांवर नको म्हणून शेतकरी कुटुंबातील विद्यार्थी अर्ध्यावर शिक्षण सोडतात किंवा आत्महत्या करतात.एवढ्या शुल्लक कारणांसाठी विद्यार्थ्यांनी अर्ध्यावर शिक्षण सोडणे किंवा आत्महत्या करणे हे अतिशय दुर्देवी आहे.आपल्या अवती भोवती अनेक गरजु, होतकरू विद्यार्थी शिक्षणापासुन वंचित राहतात त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणुन शैक्षणिक प्रगल्भ करणे हा देशाच्या विकासाचा पाया आहे. आपण सर्व विद्यार्थी मिळुन आपल्यातील गरजु व होतकरू विद्यार्थ्यांना मदतीचा हात देऊन त्यांना सक्षम करूया. याकरिता रयत विद्यार्थी विचार मंच कार्य करत आहे. आपणही या संकल्पनेत सहभाग घेऊन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मदतीचा हात पुढे करूया..

- **धम्मराज नवनाथ साळवे**

**संस्थापक / अध्यक्ष**




चला बनू भविष्य जगाचे...
art_bhagyashree







दिनांक ०२ जानेवारी २०२२

निगडी शक्ती भक्ती चौक  येथे  गरजुंना अन्नदान करण्यात आले..








## दिनांक २० जानेवारी २०२२
## दहावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेसंदर्भात मार्गदर्शन

ज्ञानसागर शाळा चिखली या ठिकाणी १० वि च्या विद्यार्थ्यांना येणाऱ्या परिक्षेसंदर्भात मार्गदर्शनपर कार्यक्रम  आयोजित करण्यात आला होता.प्रमुख पाहुणे म्हणून रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर यांना शाळेच्या वतीने निमंत्रीत करण्यात आले होते.रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर सामाजिक कार्यकर्ते जितेंद्र यादव यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेसंदर्भात मार्गदर्शन केले.धम्मराज साळवे सर यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.व तसेच यावेळी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने शाळेच्या संचालिका यांना भारतीय संविधानाची प्रास्तविका देण्यात आली.



दिनांक १३ फेब्रुवारी २०२२

रयत  शिक्षण संस्थेचे महात्मा फुले पिंपरी महाविद्यालयाचे
प्राचार्य डॉ.पांडुरंग गायकवाड,विद्यार्थी नेतृत्व बुद्धभूषण गायकवाड व
संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे एका लग्न समारंभाच्या कार्यक्रमप्रसंगी






## दिनांक १४ फेब्रुवारी २०२२

## छत्रपती शिवाजी महाराज जयंती

रयत शिक्षण संस्थेचे महात्मा फुले महाविद्यालय व रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिम्मित "' छत्रपती शिवाजी महाराज व आजचा तरुण " या कार्यक्रमाचे पिंपरी चिंचवड शहराचे पोलीस आयुक्त मा. कृष्णप्रकाश सर यांना निमंत्रण देण्यात आले


सुस्वागतम्


छत्रपती शिवाजी महाराज
सुस्वागतम्


सुस्वागतम्






सुस्वागतम्








छत्रपती शिवाजी महाराज
जयंतीनिमित्त व्याख्यान







## दिनांक १८ फेब्रुवारी २०२२
## छत्रपती शिवाजी महाराज जयंती प्रबोधनपर्व

रयत शिक्षण संस्थेचे महात्मा फुले महाविद्यालय व रयत विद्यार्थी विचार मंच यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त "छत्रपती शिवाजी महाराज आणि आजचा तरुण." या विषयावर प्रबोधनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते..प्रमुख पाहुणे म्हणून पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त मा. कृष्णप्रकाश सर व पोलीस उपायुक्त मंचक इप्पर सर हे उपस्थित होते.या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पांडुरंग गायकवाड सर होते तसेच कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष धम्मराज साळवे सर होते..या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. पांडुरंग भोसले यांनी केले. सूत्र संचलन डॉ. कामायनी सुर्वे यांनी व्यक्त केले. आभार रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या महासचिव प्राजक्ता गायकवाड यांनी मानले .व या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे सर्व शिक्षक व रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.







**दिनांक १९ फेब्रुवारी २०२२**

**छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त अभिवादन**

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त भोसरी येथील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक PCMT चौक येथे रयत विद्यार्थी विचार मंच पिंपरी चिंचवड शहर कार्यकारणीच्या वतीने महाराजांना अभिवादन करण्यात आले..यावेळी रयत विद्यार्थी विचार मंच प्रदेश महासचिव संतोष शिंदे सर,पिंपरी चिंचवड शहाराध्यक्ष मयुर जगताप, शहर प्रभारी अध्यक्ष अभिजीत साळुंखे,शहर उपाध्यक्ष प्रगती कोपरे, शहर संपर्क प्रमुख अभिजीत लगाडे, सदस्य मयुर नाईक, किशोर शेळकंदे,दर्शन भुजबळ इत्यादी उपस्थित होते.










## दिनांक १९ फेब्रुवारी २०२२

## छत्रपती शिवाजी महाराज शैक्षणिक जयंती

कल्याण , ठाणे आणि मुंबई कार्यकारीणी यांच्या संयुक्त विद्यमानाने आज दिनांक १९ फेब्रुवारी २२ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आयु. धम्मराज साळवे सर व प्रभारी प्रदेश अध्यक्ष तथा प्रदेश सचिव अमर शोभा श्याम. मुनेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली स्वामी विवेकानंद संध्या माध्यमिक विद्यालय येथे १ली ते ४ थी चा विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहीत्य (पाटी,खडू, रंगीत खडू,प्रत्येकी तीन वह्या, पेन्सिल) आणि ५ वी ते ९ वी च्या विद्यार्थ्यांना (प्रत्येकी वह्या आणि पेन्सिल) देण्यात आल्या.



महात्मा फुले महाविद्यालयात आयोजित प्रबोधनपर व्याख्यानात बोलताना पोलिस आयुक्त कृष्ण प्रकाश.

करण्यात आले होते. या वेळी शिववंदना, शिवचरित्र, नृत्य, व्याख्याने आणि ढोल - ताशा, लेझीम पथकाद्वारे मानवंदना देण्यात आली. रयत शिक्षण संस्थेच्या पिंपरीतील महात्मा फुले महाविद्यालयात विद्यार्थी विकास मंडळ व रयत विद्यार्थी विचार मंच यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त प्रबोधनपर व्याख्यानाचे आयोजन केले होते. या वेळी पोलिस आयुक्त कृष्ण प्रकाश म्हणाले, की छत्रपती शिवाजी महाराजांनी जातीभेद, धर्मभेद मानला नाही. त्याकाळच्या शासन व्यवस्थेत त्यांनी भूमापन करून ग्राम व नगर व्यवस्था निर्माण केली, शेतीसाठी शेततळी बांधणे, वृक्ष लागवड करणे, बंधारे बांधणे, तसेच पतसंस्थांची निर्मिती केली, न्यायव्यवस्था, आरमारची निर्मिती, गड-कोटव्यवस्था अशी चौफेर शासन व्यवस्था त्यांनी निर्माण केली. आजच्या शासक प्रशासनासाठी महाराजांचे कार्य आदर्शदायी आहे. प्राचार्य डॉ. पांडुरंग गायकवाड म्हणाले, की अन्याय-अत्याचारा विरुद्ध संघर्ष करून छत्रपती शिवाजी महाराजांनी सुराज्य व्यवस्था निर्माण केली. शेतकऱ्यांच्या भाजीच्या देठालाही हात लागणार नाही, अशी प्रशासन व्यवस्था तयार केली.

# मेट्रो सिटी वृत्तांत

## छत्रपती शिवाजी महाराज हे वैश्विक व्यक्तिमत्व आहे.-आयुक्त कृष्णप्रकाश

### छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त प्रबोधनपर व्याख्यानाचे आयोजन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले महाविद्यालयात विद्यार्थी विकास मंडळ व रयत विद्यार्थी विचार मंच यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त प्रबोधनपर व्याख्यानाचे आयोजन करून जयंती साजरी करण्यात आली होती. "अतुलनीय वैश्विक योध्दा, कुशल प्रशासक, छ. शिवाजी महाराजांची ओळख आहे. ते केवळ मराठ्यांचे किंवा महाराष्ट्राचे नव्हे तर छत्रपती शिवाजी महाराज हे वैश्विक व्यक्तिमत्व आहे.

त्यांच्या प्रशासनाचा, गनिमी काव्याचा, युद्धतंत्राचा आज जगभर अभ्यास केला जातो.

महाराजांनी जातीभेद, धर्मभेद मानला नाही. ते धार्मिक होते परंतु सहिष्णू होते. त्याकाळच्या शासन व्यवस्थेत त्यांनी भूमापन करून ग्राम व नगर व्यवस्था निर्माण केली, शेतीसाठी शेततळी बांधणे, वृक्ष लागवड करणे, बंधारे बांधणे, तसेच पतसंस्थांची निर्मिती केली, न्यायव्यवस्था, आरमारची निर्मिती, गड-कोटव्यवस्था अशी चौफेर शासन व्यवस्था त्यांनी निर्माण केली. आजच्या शासक प्रशासनासाठी महाराजांचे कार्य आदर्शदायी आहे. तरुणांनी महाराजांच्या जीवन कार्याचा अभ्यास केला पाहिजे." असे विचार पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त कृष्णप्रकाश यांनी मांडले.



रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले महाविद्यालयात विद्यार्थी विकास मंडळ व रयत विद्यार्थी विचार मंच यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त प्रबोधनपर व्याख्यानाचे आयोजन केले होते. विषय होता "छत्रपती शिवाजी महाराज आणि आजचा तरुण." प्रमुख पाहुणे म्हणून पिंपरी चिंचवड चे पोलीस आयुक्त कृष्णप्रकाश व पोलीस उपआयुक्त मंचक इप्पर हे उपस्थित होते.

यावेळी पोलीस उप आयुक्त मंचक इप्पर म्हणाले की, "छत्रपतींचा इतिहास नव्हे तर छत्रपती शिवाजी महाराजांना समजून घेतले पाहिजे. छत्रपती शिवराय हे जगातले एकमेव असे राजे आहत जे चारशे वर्ष झाली तरी रयतेच्या मनामनात आहेत. आजही स्त्रियांना पुरुषांकडून शिवरायांच्या आदर्शाची अपेक्षा आहे. आपल्या जीवनातील स्वप्न, ध्येय पूर्ण करण्यासाठी तरुणांनी शिवरायांचा आदर्श पुढे ठेवला पाहिजे."

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पांडुरंग गायकवाड म्हणाले की, "अन्याय अत्याचारा विरुध्द संघर्ष करून महाराजांनी सुराज्य व्यवस्था निर्माण केली. शेतकऱ्यांच्या भाजीच्या देठालाही हात लागणार नाही अशी प्रशासन व्यवस्था तयार केली महाराजांना रयतेची जाण होती.

या रयतेसाठी त्यांनी स्वराज्य उभे केले. महाराजांचा आदर्श ठेवूनच कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली." या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. पांडुरंग भोसले यांनी केले. मनोगत रयत विद्यार्थी विचार मंचाचे धम्मराज साळवे यांनी व्यक्त केले. सूत्र संचलन डॉ. कामायनी सुर्वे यांनी व्यक्त केले. आभार रयत विद्यार्थी विचार मंच प्राजक्ता गायकवाड यांनी मानले. महाविद्यालयाच्या कला वाणिज्य विभागाच्या उपप्राचार्य डॉ. मृणालिनी शेखर, विज्ञान विभागाचे उपप्राचार्य प्रा. शहाजी मोरे, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा. लक्ष्मण जगदाळे, अंतर्गत गुणवत्ता कक्षाचे डॉ. नीळकंठ डहाळे, कार्यालयाच्या सौ. उज्वला तावरे रयत विद्यार्थी विचार मंच चे प्रदेश महासचिव संतोष शिंदे ,अतुल वाघमारे,विक्रांत शेळके,मयूर जगताप,अभिजित साळुंखे,अभिजित लगाडे,स्वराज कांबळे,आकाश गुंजाळ,प्रमोद लोंढे ,योगेश कांबळे,प्राजक्ता गायकवाड,प्रगती कोपरे,भाग्यश्री आखाडे,प्रणाली कावरे,प्रतिभा बनसोडे,माधवी खरात,किरण ओपळे, विकी वाघमारे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. महाविद्यालयाचे सर्व विद्यार्थी, प्राध्यापक वर्ग, या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

PAGE 4

22-02-2022


कार्यकारी संपादक- कलिंदर शेख 7020552424

# निर्भय पत्रकार

www.nirbhaypatrakar.com


## "छत्रपती शिवाजी महाराज हे वैश्विक व्यक्तिमत्व आहे." पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त कृष्णप्रकाश (IPS)







**रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले महाविद्यालयात विद्यार्थी विकास मंडळ व रयत विद्यार्थी विचार मंच यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त प्रबोधनपर व्याख्यानाचे आयोजन करून जयंती साजरी करण्यात आली.**

पिंपरी:-"अतुलनीय वैश्विक योध्दा, कुशल प्रशासक, छत्रपती शिवाजी महाराजांची ओळख आहे. ते केवळ मराठ्यांचे किंवा महाराष्ट्राचे नव्हे तर छत्रपती शिवाजी महाराज हे वैश्विक व्यक्तिमत्व आहे. त्यांच्या प्रशासनाचा, गनिमी काव्याचा, युद्धतंत्राचा आज जगभर अभ्यास केला जातो. महाराजांनी जातीभेद, धर्मभेद मानला नाही. ते धार्मिक होते परंतु सहिष्णू होते. त्याकाळच्या शासन व्यवस्थेत त्यांनी भूमापन करून ग्राम व नगर व्यवस्था निर्माण केली, शेतीसाठी शेततळी बांधणे, वृक्ष लागवड करणे, बंधारे बांधणे,तसेच पतसंस्थांची निर्मिती केली, न्यायव्यवस्था, आरमारची निर्मिती, गड-कोटव्यवस्था अशी चौफेर शासन व्यवस्था त्यांनी निर्माण केली. आजच्या शासक प्रशासनासाठी महाराजांचे कार्य आदर्शदायी आहे. तरुणांनी महाराजांच्या जीवन कार्याचा अभ्यास केला पाहिजे." असे विचार पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त कृष्णप्रकाश यांनी मांडले.रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले महाविद्यालयात विद्यार्थी विकास मंडळ व रयत विद्यार्थी विचार मंच यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त प्रबोधनपर व्याख्यानाचे आयोजन केले होते. विषय होता "छत्रपती शिवाजी महाराज आणि आजचा तरुण." प्रमुख पाहुणे म्हणून पिंपरी चिंचवड चे पोलीस आयुक्त कृष्णप्रकाश व पोलीस उपआयुक्त मंचक इप्पर हे उपस्थित होते. यावेळी पोलीस उप आयुक्त मंचक इप्पर म्हणाले की, "छत्रपतींचा इतिहास नव्हे तर छत्रपती शिवाजी महाराजांना समजून घेतले पाहिजे. छत्रपती शिवराय हे जगातले एकमेव असे राजे आहेत जे चारशे वर्ष झाली तरी रयतेच्या मनामनात आहेत. आजही स्त्रियांना पुरुषांकडून शिवरायांच्या आदर्शाची अपेक्षा आहे. आपल्या जीवनातील स्वप्न, ध्येय पूर्ण करण्यासाठी तरुणांनी शिवरायांचा आदर्श पुढे ठेवला पाहिजे"या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पांडुरंग गायकवाड म्हणाले की, "अन्याय अत्याचारा विरुध्द संघर्ष करून महाराजांनी सुराज्य व्यवस्था निर्माण केली. शेतकऱ्यांच्या भाजीच्या देठालाही हात लागणार नाही अशी प्रशासन व्यवस्था तयार केली महाराजांना रयतेची जाण होती.या रयतेसाठी त्यांनी स्वराज्य उभे केले. महाराजांचा आदर्श ठेवूनच कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली."या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. पांडुरंग भोसले यांनी केले.मनोगत रयत विद्यार्थी विचार मंचाचे धम्मराज साळवे यांनी व्यक्त केले. सूत्र संचलन डॉ.कामायनी सुर्वे यांनी व्यक्त केले. आभार रयत विद्यार्थी विचार मंच प्राजक्ता गायकवाड यांनी मानले. महाविद्यालयाच्या कला वाणिज्य विभागाच्या उपप्राचार्य डॉ. मृणालिनी शेखर, विज्ञान विभागाचे उपप्राचार्य प्रा.शहाजी मोरे,कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा. लक्ष्मण जगदाळे,अंतर्गत गुणवत्ता कक्षाचे डॉ. नीळकंठ डहाळे, कार्यालयाच्या सौ.उज्वला तावरे रयत विद्यार्थी विचार मंचचे प्रदेश महासचिव संतोष शिंदे,अतुल वाघमारे, विक्रांत शेळके, मयूर जगताप, अभिजित साळुंखे, अभिजित लगाडे, स्वराज कांबळे, आकाश गुंजाळ, प्रमोद लोंढे,योगेश कांबळे,प्राजक्ता गायकवाड, प्रगती कोपरे, भाग्यश्री आखाडे, प्रणाली कावरे, प्रतिभा बनसोडे,माधवी खरात,किरण ओपळे, विकी वाघमारे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. महाविद्यालयाचे सर्व विद्यार्थी, प्राध्यापक वर्ग, या कार्यक्रमासाठी उपस्थित होता.



लोकमत

शहरामध्ये शिवजयंतीचा वाढला उत्साह

आजी आणि बालशिवाजी

दुचाकी रॅली

# शिवाजी महाराज वैश्विक व्यक्तिमत्त्व

## पोलीस आयुक्त कृष्ण प्रकाश : शिवजयंतीनिमित्त पिंपरीमध्ये व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

**पिंपरी** : छत्रपती शिवाजी केवळ मराठ्यांचे किंवा महाराष्ट्राचे नव्हे, तर छत्रपती शिवाजी महाराज हे वैश्विक व्यक्तिमत्व आहे. त्यांच्या प्रशासनाचा, गनिमी काव्याचा, युद्धतंत्राचा आज जगभर अभ्यास केला जातो, असे प्रतिपादन पोलीस आयुक्त कृष्ण प्रकाश यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त व्याख्यानाचे आयोजन केले होते. "छत्रपती शिवाजी महाराज आणि आजचा तरुण होता असा? या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पांडुरंग गायकवाड, पोलीस उपआयुक्त मंचक इप्पर, उपप्राचार्य डॉ. मृणालिनी शेखर, उपप्राचार्य प्रा. शहाजी मोरे, प्रा. लक्ष्मण जगदाळे, डॉ. नीळकंठ डहाळे, उज्ज्वला तावरे आदी उपस्थित होते.

कृष्ण प्रकाश म्हणाले, "महाराजांनी जातीभेद, धर्मभेद मानला नाही. त्या काळच्या शासन व्यवस्थेत त्यांनी भूमापन करून ग्राम व नगर व्यवस्था निर्माण केली, शेतीसाठी शेततळी बांधणे, वृक्ष लागवड करणे, बंधारे बांधणे, तसेच पतसंस्थांची निर्मिती केली, न्यायव्यवस्था, आरमारची निर्मिती, गड-कोटव्यवस्था अशी चौफेर शासन व्यवस्था त्यांनी निर्माण केली. आजच्या शासक प्रशासनासाठी महाराजांचे कार्य आदर्शदायी आहे. तरुणांनी महाराजांच्या जीवन कार्याचा अभ्यास केला पाहिजे."

पोलीस उपआयुक्त इप्पर म्हणाले, "छत्रपतींचा इतिहास नव्हे तर छत्रपती शिवाजी महाराजांना समजून घेतले पाहिजे. छत्रपती शिवराय हे जगातले एकमेव असे राजे आहोत जे चारशे वर्ष झाली तरी रयतेच्या मनामनात आहेत. आपल्या जीवनातील स्वप्न, ध्येय पूर्ण करण्यासाठी तरुणांनी शिवरायांचा आदर्श पुढे ठेवला पाहिजे." डॉ. पांडुरंग भोसले यांनी प्रास्ताविक केले. रयत विद्यार्थी मंचाचे धम्मराज साळवी यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. कामायनी सुर्वे यांनी सूत्रसंचालन केले.

अभिमान इंग्लिश मीडियम प्रायमरी स्कूल येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करण्यात आली. मुख्याध्यापिका स्मिता भोसले यांनी शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. संस्थेचे कार्याध्यक्ष वालचंद संचेती, स्मिता भोसले उपस्थित होते.

### भारतीय विद्यानिकेतनमध्ये मार्गदर्शन

**सांगवी** : जुनी सांगवीतील अरविंद एज्युकेशन सोसायटीच्या भारतीय विद्यानिकेतन प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात शिवजयंती विविध कार्यक्रमांनी साजरी झाली. यावेळी कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून संस्थेच्या अध्यक्षा आरती राव, संस्थेचे सचिव प्रणव राव यांच्यासह मुख्याध्यापिका आशा घोरपडे, पर्यवेक्षिका स्मिता बर्गे, कीर्ती शिपी, प्रीती पितळे, शिक्षकवृंद उपस्थित होते. आरती राव यांनी मार्गदर्शन केले. शिक्षिका कीर्ती शिपी यांनी विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराज कसे घडले? त्यांचे कार्य, महत्त्व आणि जीवनकार्य उलगडून सांगितले. आशा घोरपडे यांनी शिवाजी महाराजांच्या विचारांचे पालन करणे ही काळाची गरज असल्याचे स्पष्ट केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रीती पितळे यांनी केले.

### शिवछत्रपती सर्वधर्म समभावाचे प्रतीक : नखाते

**पिंपरी** : 'छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याचे रुपांतर सुराज्यात करण्यासाठी प्रयत्न केले. महाराष्ट्रातील अठरापगड जातीच्या लोकांना हे स्वराज्य आपले वाटावे, अशी भावना मनात रुजवली.' असे मत काशीनाथ नखाते यांनी व्यक्त केले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त कष्टकरी संघर्ष महासंघातर्फे चिंचवड येथे शनिवारी कार्यक्रमांचे आयोजन केले होते. यावेळी नखाते बोलत होते. कष्टकरी कामगार अंजना गायकवाड व माधुरी जलमुलवार यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. निरंजन लोखंडे, दिनेश कदम, राजेंद्र लोखंडे, सूरज देशमाने, अनिल बारवकर, सिद्धनाथ देशमुख, रसिला मोरे, वैजयंता जाधव, अनिता पाखले, ताई मोरे उपस्थित होते.

Hello Pimpri Chinchwad
Page No. 4 Feb 20, 2022
Powered by: erelego.com

दिनांक २० फेब्रुवारी २०२२

रयत शिक्षण संस्थेचे महात्मा फुले महाविद्यालय व रयत विद्यार्थी विचार मंच यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त "छत्रपती शिवाजी महाराज आणि आजचा तरुण." या विषयावर प्रबोधनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते त्याची वृत्तपत्रांनी घेतलेली दखल.





## दिनाक १ मार्च २०२२

## शिक्षणराज्यामंत्री बच्चूभाऊ यांचा रयत विद्यार्थी विचार मंच वतीने सन्मान

कर्तव्यदक्ष नेता ,दिव्यांगाचा आवाज ,सामाजिक भान आणि जाण असलेले शिक्षण राजमंत्री मानणीय नामदार ओमप्रकाश तथा बच्चू भाऊ कडू एक यांच्या बरोबर शैक्षणिक समस्यांसंदर्भात चर्चा करून संविधान प्रास्ताविक देऊन रयत विद्यार्थी विचार मंच च्या वतीने सन्मान करण्यात आला.






## दिनांक १३ मार्च २०२२
## जागतिक महिलादिन साजरा

रयत विद्यार्थी विचार मंच महाराष्ट्र राज्य संस्थेच्या कल्याण , ठाणे आणि मुंबई प्रदेश कार्यकारिणीच्या सदस्यांनी अंकुर बालविकास केंद्र ( आश्रम ) चालविणाऱ्या आश्रमाच्या अध्यक्षा सौ. अक्षदा अभय भोसले मॅडम यांचा आदर्श महिला पुरस्कार २०२२ प्रदान करीत गौरव केला. एक स्त्री कितीही अडचणींना सहजतेने पार करत कशा प्रकारे उत्तम कार्य करु शकते याचं उत्तम उदाहरण समाजासमोर ठेवण्याचे काम सौ भोसले मॅडम यांनी केले आहे.

सदर कार्यक्रमास सोमनाथ पाटील ( अध्यक्ष कल्याण तालुका ) , निखिल उबाळे ( महासचिव कल्याण ) , सूरज ताजणे ( अध्यक्ष ठाणे जिल्हा ) , अमर शोभा श्याम मुनेश्वर ( प्रदेश सचिव तथा प्रभारी अध्यक्ष ) , अपर्णा जाधव( प्राध्यापिका ) उपस्थित होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुंबई प्रदेशाध्यक्ष रोहित सोनवणे होते.

पुण्यनगरी

# पालिकेने आरोग्यसेविकेची भरती रद्द केल्याने महिलांना मनस्ताप

## राज्यभरातून साडेतीनशेहून अधिक उमेदवारांची हजेरी : प्रशासनाच्या विरोधात व्यक्त केला प्रचंड रोष



**पिंपरी : प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेने आरोग्य सुविधांची (एएनएम)मुलाखतीद्वारे १६ व १७ मार्च रोजी होणारी भरती प्रक्रिया अचानकपणे रद्द केली. महापालिकेच्या गलथान कारभारामुळे राज्यातील विविध जिल्ह्यातून आलेल्या सुमारे साडेतीनशे महिला उमेदवारांना मनस्ताप सहन करावा लागला. पालिका प्रशासनाच्या विरोधात महिला उमेदवारांनी रोष व्यक्त केला आहे.

पिंपरी चिंचवड महापालिकेत राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत आरोग्यसेविका (एएनएम) या रिक्त पदासांठी ७ मार्च रोजी जाहिरात प्रसिद्ध केली होती. या पदाच्या ८८ जागा थेट मुलाखतीतून भरण्यात येणार होत्या. ही भरती कंत्राटी स्वरुपाची असणार आहे. थेट मुलाखती चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात १६ व १७ मार्च रोजी आयोजित करण्यात आल्या होत्या. मात्र, प्रशासकीय कारणास्तव ही भरती प्रक्रिया रद्द करण्यात केल्याचे पालिका वैद्यकीय विभागाने मंगळवारी (दि. १५) जाहीर केले. मात्र, राज्यातील विविध भागातील उमेदवारांना परीक्षा रद्द झाल्याचे माहिती नव्हते.

दरम्यान, गडचिरोली, सोलापूर, नाशिक, औरंगाबाद, सातारा, कोल्हापूर, अकोला अशा विविध जिल्ह्यातून मुलाखती देण्यासाठी महिला बुधवारी दाखल झाल्या. त्यांनी प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहासमोर गर्दी केली. सुमारे साडेतीनशे महिला उमेदवार दाखल झाले होते. तेथे परीक्षा रद्द झाल्याचे समजल्यानंतर महिलांनी महापालिका भवनात गर्दी केली. अचानक परीक्षा रद्द केल्याने त्यांनी संताप व्यक्त केला. महापालिकेच्या गलथान कारभाराचा या परीक्षार्थींना आर्थिक आणि मानसिक मनस्ताप सहन करावा लागला.

> माझ्यावर कुटुंबाची जबाबदारी आहे. प्रशासनाच्या चुकीमुळे परीक्षा रद्द झाली. आमचे म्हणणे देखील कोणी ऐकले नाही. जाहिरातीमध्ये फक्त ४३ वयाची अट असून माझी वयाची मर्यादा दोन महिन्यांनी संपत आहे. भरती प्रक्रिया पुढे गेल्यामुळे आमचे न भरून निघणारे नुकसान झाले आहे.
>
> – कांचन गुंजकर, बुलढाणा.

> ही परीक्षा रद्द करण्यासाठी मंगळवारी दुपारी मान्यता मिळाली. त्यानंतर त्वरित प्रेसनोट आणि महापालिका संकेतस्थळावर टाकण्यात आली. तसेच ज्या ठिकाणी परीक्षा तेथे एक फ्लेक्स लावून परीक्षा रद्दची माहिती जाहीर केली आहे. व्हॉट्सॲपच्या विविध ग्रुपवर परीक्षा रद्द करण्यात आल्याबाबत माहिती देण्यात आली.
>
> –डॉ. पवन साळवे, अतिरिक्त वैद्यकीय अधिकारी, पिं. चिं. पालिका

### ‘प्रशासनाने जाहीर माफी मागावी’

प्रशासनाच्या गलथान व बेजबाबदार कारभारामुळे अचानक भरती प्रक्रिया रद्द करण्यात आली. त्यामुळे आरोग्यसेविका भरती व मुलाखतीसाठी आलेल्या विद्यार्थीनी व महिला यांची प्रशासनाने जाहीर माफी मागावी. परत अशी चूक होणार नाही. याची दक्षता घ्यावी. तसेच, ज्यांच्याकडून ही चूक झाली ? त्यांना नोटीस देण्यात यावी, अशी मागणी निवेदनाव्दारे पिंपरी चिंचवड महापालिकेचे प्रशासक तथा आयुक्तांकडे रयत विद्यार्थी विचार मंचतर्फे धम्मराज साळवे व संतोष शिंदे यांनी केली आहे.

Smart Pimpri-Chinchwad
Page No.1 March 17, 2022

दिनांक १७ मार्च २०२२

लोकमत

# आंबेडकर जयंतीनिमित्त एक वही, एक पेन अभियान

## रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचा उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित एक वही, एक पेन अभियान राबविण्यात येणार आहे. हे अभियान १४ एप्रिलला डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक भीमसृष्टी पिंपरी या ठिकाणी राबविण्यात येणार असल्याचे रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे यांनी सांगितले.

डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचा आदर्श घेत रयत विद्यार्थी विचार मंच संस्था पिंपरी चिंचवड शहरात व महाराष्ट्रात गेली पाच वर्षे शैक्षणिक क्षेत्रात काम करत आहे. रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या माध्यमातून अनेक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रश्न सोडवले जातात. वेळोवेळी गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यांचे वाटप केले जाते. डॉ. बाबासाहेब यांच्या जयंतीला हार, फुल अर्पण करण्यापेक्षा त्यावेजी एक वही, एकी पेन अर्पण करावे. जमा झालेले शैक्षणिक साहित्य पिंपरी चिंचवड शहरातील गरीब गरजू विद्यार्थ्यांना वाटप करण्यात येईल.

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे, प्रदेश महासचिव संतोष शिंदे, पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष मयूर जगताप यांच्या वतीने नागरिकांना आवाहन करण्यात करण्यात येत आहे.

Hello Pimpri Chinchwad
Page No. 8 Mar 31, 2022
Powered by: erelego.com

# डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त ‘एक वही, एक पेन’ उपक्रम

**पिंपरी, दि. ३० (प्रतिनिधी)** - भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त ‘एक वही, एक पेन’ हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी (दि. १४ एप्रिल) सकाळी १० ते रात्री ८ वाजेपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक भीमसृष्टी पिंपरी येथे हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. इच्छुकांनी हार, फुलांऐवजी ‘एक वही एकी पेन’ अर्पण करावे. जमा झालेले साहित्य पिंपरी चिंचवड शहरातील गरीब गरजू विद्यार्थ्यांना वाटप करण्यात येणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त नागरिकांनी वही, पेन दान करावे, असे आवाहन धम्मराज साळवे यांनी केले आहे.

प्रभात Thu, https

दिनांक ३१ मार्च २०२२

डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिम्मित एक वही एक पेन अभियान राबवण्यात येणार होते त्यास सर्व नागरिकांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद द्यावा याकरिता प्रेसच्या माध्यमातून आवाहन करण्यात आले होते त्याची दैनिक प्रभात व लोकमत ने घेतलेली दखल

दिनांक १ एप्रिल २०२२

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळेत शिकणाऱ्या १० वी च्या विद्यार्थ्यांना हक्काचे बक्षीस मिळावे याकरिता माध्यमिक शिक्षण विभागाचे उपायुक्त यांना संस्थेच्या संस्थेच्या वतीने निवेदन देण्यात आले होते त्याची दैनिक पुढारी ने घेतलेली दखल.

# मनपाच्या गुणवंत विद्यार्थ्यांना हक्काचे बक्षीस मिळावे

**पिंपरी : पुढारी वृत्तसेवा**

महापालिका शाळांतील इयत्ता दहावीचे गुणवंत विद्यार्थ्यांची संख्या जास्त असल्यामुळे त्यांना महापालिकेने बक्षीस देण्यास नकार दिला आहे. मात्र, नागरवस्ती विभागाद्वारे विद्यार्थ्यांना सव्वा नऊ कोटी रुपयांच्या बक्षीसांचे वाटप करण्यात आले आहे. ही भेदभावाची वागणूक दूर करून मनपा विद्यार्थ्यांनाही हक्काचे बक्षीस द्यावे, अशी मागणी रयत विद्यार्थी मंचतर्फे करण्यात आली आहे.

याबाबत संस्थेचे संस्थापक धम्मराज साळवे यांनी उपायुक्त संदीप खोत यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महापालिकेच्या माध्यमिक शाळांमधील जे विद्यार्थी दहावी बोर्डाच्या परीक्षेत ८५ ते ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवितात. त्यांना अनुक्रमे ५० हजार आणि २ लाख रुपये अशी ठराविक रक्कम माध्यमिक विभागामार्फत बक्षीस म्हणून देण्यात येते. परंतु अंतर्गत मूल्यमापन करून निकाल काढण्यात आल्यामुळे गुणवंत विद्यार्थ्यांची संख्या १५० इतकी झाली आहे. हे कारण देऊन पालिकेच्या माध्यमिक विभागाने महापालिकेच्या शाळेतीलच गोरगरीब विद्यार्थ्यांना बक्षिस देण्यास नकार दिला आहे.

दुसरीकडे खासगी शाळा आणि महाविद्यालय यामधील ५ हजार २४९ गुणवंत विद्यार्थ्यांना नागरवस्ती विभागातर्फे तब्बल सव्वा नऊ कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले आहे. माध्यमिक विभाग कुठे तरी भेदभाव करत आहे असे या निर्णयातून दिसून येत आहे. महापालिका व माध्यमिक विभागाने जाणीवपूर्वक भेदभाव करून घेतलेल्या या निंदनीय निर्णयाचा आम्ही जाहीर निषेध करतो. तरी आपण आपल्या निर्णयाचा फेरविचार करून तात्काळ महापालिकेच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या हक्काचे बक्षीस द्यावे, अशी मागणी केली आहे.




**दिनांक ११ एप्रिल २०२२**

**क्रांतीसुर्य महात्मा फुले जयंती**

क्रांतीसुर्य महात्मा फुले जयंतीनिमित्त रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने अभिवादन करण्यात आले.यावेळी संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर, प्रदेश महासचिव संतोष शिंदे,पिंपरी चिंचवड अध्यक्ष मयूर जगताप,शहर सचिव प्रगती कोपरे,शहर उपाध्यक्ष समाधान गायकवाड,शहर संघटक अभिजित लगाडे,सदस्य माधवी खरात, ॲड. उमेश गवळी उपस्थित होते..






















## दिनांक १४ एप्रिल २०२२

## बाबासाहेब आंबेडकर जयंती वहीपेन संकलन_अभियान

रयत विदयार्थी विचार मंच व भारतीय बौद्धजण विकास समिती यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी डॉ.बाबासाहेब आंबडकर स्मारक या ठिकाणी वही पेनअभियान राबवण्यात आले.यास नागरिकांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला..७५० डझन वह्या रजिस्टर व पेन साहित्य जमा झाले.



गुड मॉर्निंग — पिंपरी-चिंचवड — प्रभात पुणे, शुक्रवार, दि. १५ एप्रिल २०२२

# महामानवास अभिवादनासाठी लोटला जनसागर

## निर्बंध शिथिल झाल्याने अनुयायांमध्ये उत्साह : विविध उपक्रम, कार्यक्रमांमधून अभिवादन

### काँग्रेस पर्यावरण विभागाच्या वतीने वृक्षारोपण

प्रभात Fri, 15 April 2022 https://epaper.eprabhat.net/c/67461540

दिनांक १५ एप्रिल २०२२

दिनांक १६ एप्रिल २०२२



## महात्मा बसवेश्वर यांना अभिवादन

पिंपरी, दि. ५ (प्रतिनिधी) - समतावादी महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने रयत विद्यार्थी विचार मंच संपर्क कार्यालयात अभिवादन करण्यात आले. पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष मयूर जगताप व शहर संघटक अभिजित लगाडे यांच्या हस्ते संत बसवेश्वर यांना पुष्पहार अर्पण करण्यात आले.

यावेळी संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे, प्रदेश महासचिव संतोष शिंदे, पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष मयुर जगताप तसेच शहर संघटक अभिजीत लगाडे, शहर उपाध्यक्ष समाधान गायकवाड आदी उपस्थित होते.

प्रभात Fri, 1 https:

**Santosh Subhash Shinde** is in **Aurangabad, Maharashtra**.
3 Apr · Aurangabad, Maharashtra ·

#मिलिंद_महाविद्यालयाची_दुरावस्था

खासदार इम्तियाज जलील साहेब यांची औरंगाबाद येथील त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली असता साहेबांना डॉ.बाबासाहेब आंबडकर यांनी औरंगाबाद येथे स्थापन केलेल्या मिलिंद महाविद्यालयाची झालेली दुरावस्था याबद्दल चर्चा केली व आपण राज्य व केंद्र सरकारकडे पाठपुरावा करून मिलिंद महाविद्यालयासाठी निधी आणून महाविद्यालयाची होत असलेली दुरावस्था थांबवावी अशी विनंती केली...

यावेळी साहेबांनी सांगितले की मी अगोदर देखील पाठपुरावा केलेला आहे व यापुढेही राज्य व केंद्र सरकारशी पत्रव्यवहार नक्की करेन...



# पंतप्रधानांनी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या शैक्षणिक संस्थानांच्या सर्वांगिण विकासासाठी १०० कोटीचे विशेष पॅकेज द्यावे : खा. इम्तियाज जलील

**औरंगाबाद / लोकरत्न प्रतिनिधी**

खासदार इम्तियाज जलील यांनी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहेबांनी स्थापन केलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, मिलिंद कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स ॲण्ड साईन्स, डॉ.आंबेडकर लॉ कॉलेज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर कॉमर्स ॲण्ड आर्टस कॉलेज, पीईएस पॉलिटेक्निक ॲण्ड इंजिनिअरींग कॉलेज, पीईएस फिजिकल एज्युकेशन कॉलेज (बीपीएड), मिलिंद मल्टीपर्पज हायस्कुल व महाविद्यालय यांच्या सर्वांगिण विकास होण्यासाठी, मूलभूत व पायाभूत सुविधांचे बळकटीकरण तसेच समस्त विद्याथ्यार्ना व संशोधकांना आधुनिक व दजेर्दार शिक्षण उपलब्ध व्हावे याकरिता १०० कोटींचे विशेष पॅकेज घोषित करण्याची मागणी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे केली आहे. पंतप्रधानांना दिलेल्या पत्रात खासदार इम्तियाज जलील यांनी नमुद केले की, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहेबांनी आधुनिक शिक्षणापासून कोणीही वंचित राहु नये म्हणुन बौध्द लेणीच्या पायथ्याशी नयनरम्य व जैव विविधता असलेल्या परिसरात एक मोठे शिक्षण ज्ञानकेंद्र उभारलेले आहे. गुणवत्ता व सामाजिक बांधिलकी हे ब्रिद जोपासतांनाच राष्ट्र निर्मितीत योगदान देणारे विद्यार्थी, संशोधक येथून घडलेले आहेत. शैक्षणिक संस्थांच्या स्थापनेपासूनच अतिशय चांगले असे शैक्षणिक वातावरण येथे आहे. सबब विद्यापीठ व शैक्षणिक संस्थानात अतिशय महत्वपूर्ण असे ज्ञानदानाचे कार्य प्रामाणिकपणे केले जात आहे. शिक्षण, संशोधन, विस्तार आणि सेवा या चतुःसुत्रीचा अवलंब विद्यापीठाने केलेला आहे. विविध विद्याशाखांतर्गत पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रम, स्पर्धात्मक परिक्षा व प्रमाणपत्र अभ्यासक्रम तसेच नाविण्यपूर्ण अभ्यासक्रम विद्यापीठाने सुरु केलेले आहेत. श्रमप्रतिष्ठेला महत्व देवुन विद्यार्थ्यांमध्ये आत्मभान व स्वयंनिर्भरता या हेतून विद्यापीठ स्तरावर महत्वपुर्ण असे कल्याणकारी योजना राबविले जातात. विद्यार्थ्यांना, संशोधकांना जास्तीत जास्त शैक्षणिक सुविधा पुरविण्यासाठी शैक्षणिक संस्था व विद्यापीठ प्रशासन अनेक विभागाच्या नवीन इमारती उभारुन रस्ते, पाणी-पुरवठा, विद्युतीकरण यांच्यासह इतर मुलभुत सुविधा देण्यासाठी सतत प्रयत्नशिल असते. याबरोबरच या परिसरात विविध भागातून शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृह सुध्दा उभारलेली असल्याचे खासदार इम्तियाज जलील यांनी पंतप्रधानांना दिलेल्या पत्रात नमुद केले आहे.

**लोकमत**

# पीईएसला १०० कोटींचे पॅकेज द्या- इम्तियाज जलील

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या शैक्षणिक संस्थांच्या सर्वांगीण विकासासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शंभर कोटींचे विशेष पॅकेज द्यावे, अशी मागणी खा. इम्तियाज जलील यांनी केली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, मिलिंद कॉलेज ऑफ आर्टस् अ‍ॅण्ड सायन्स, डॉ.आंबेडकर लॉ कॉलेज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉमर्स अ‍ॅण्ड आर्ट्स कॉलेज, पीईएस पॉलिटेक्निक अ‍ॅण्ड इंजिनीअरिंग कॉलेज, पीईएस फिजिकल एज्युकेशन कॉलेज (बीपीएड), मिलिंद मल्टीपर्पज हायस्कूल व महाविद्यालय या संस्थांसाठी त्यांनी ही मागणी केली आहे.

पंतप्रधानांना दिलेल्या पत्रात खासदार इम्तियाज जलील यांनी नमूद केले की, शिक्षण, संशोधन, विस्तार आणि सेवा या चतु:सूत्रीचा अवलंब विद्यापीठाने केलेला आहे.

विविध विद्या शाखांतर्गत पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रम, स्पर्धात्मक परीक्षा व प्रमाणपत्र अभ्यासक्रम, तसेच नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम विद्यापीठाने सुरू केलेले आहेत.

श्रमप्रतिष्ठेला महत्त्व देऊन, विद्यार्थ्यांमध्ये आत्मभान व स्वयंनिर्भरता या हेतूने विद्यापीठ स्तरावर महत्त्वपूर्ण अशा कल्याणकारी योजना राबविल्या जातात.

स्वत: डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या देखरेखीखाली 'मिलिंद'चा परिसर साकारला आहे. नागसेनवनातील विविध शैक्षणिक संस्था विद्यादानाचे कार्य करीत असताना, त्यांना या विशेष पॅकेजची अधिक गरज असल्याचेही जलील यांनी म्हटले आहे.

Hello Aurangabad
Page No. 2 Apr 17, 2022
Powered by: erelego.com

**देशोन्नती**

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या शैक्षणिक संस्थानांच्या विकासासाठी १०० कोटीचे विशेष पॅकेज द्या

देशोन्नती वृत्तसंकलन...

**औरंगाबाद** ■ भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहेबांनी स्थापन केलेल्या मिलिंद कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स अ‍ॅण्ड साईन्स, डॉ.आंबेडकर लॉ कॉलेज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर कॉमर्स अ‍ॅण्ड आर्टस् कॉलेज, पीईएस पॉलिटेक्निक अ‍ॅण्ड इंजिनिअरींग कॉलेज, पीईएस फिजिकल एज्युकेशन कॉलेज (बीपीएड), मिलिंद मल्टीपर्पज हायस्कुल व महाविद्यालय यांच्या सर्वांगिण विकास होण्यासाठी तसेच मूलभूत व पायाभूत सुविधांचे बळकटीकरण करण्यासाठी केंद्रशासनाने १०० कोटी रूपयांचे विशेष पॅकिज द्यावे अशी मागणी खा.सय्यद इम्तियाज जलील यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे केली आहे. त्याबाबतचे पत्र खा.इम्तियाज जलील यांनी नुकतेच पंतप्रधान मोदी यांना दिले आहे.

**खा. इम्तियाज जलील यांची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे मागणी**



डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहेबांनी आधुनिक शिक्षणापासून कोणीही वंचित राहु नये म्हणुन बौध्द लेणीच्या पायथ्याशी नयनरम्य व जैव विविधता असलेल्या परिसरात एक मोठे शिक्षण ज्ञानकेंद्र उभारलेले आहे. गुणवत्ता व सामाजिक बांधिलकी हे ब्रिद जोपासतांनाच राष्ट्र निर्मितीत योगदान देणारे विद्यार्थी, संशोधक येथून घडलेले आहेत. शैक्षणिक संस्थांच्या स्थापनेपासूनच अतिशय चांगले असे शैक्षणिक वातावरण येथे आहे. शिक्षण, संशोधन, विस्तार आणि सेवा या चतु:सुत्रीचा अवलंब विद्यापीठाने केलेला आहे. विविध विद्याशाखांतर्गत पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रम, स्पर्धात्मक परिक्षा व प्रमाणपत्र अभ्यासक्रम तसेच नाविण्यपूर्ण अभ्यासक्रम विद्यापीठाने सुरु केलेले आहेत.

श्रमप्रतिष्ठेला महत्व देवुन विद्यार्थ्यांमध्ये आत्मभान व स्वयंनिर्भरता या हेतून विद्यापीठ स्तरावर महत्वपुर्ण असे कल्याणकारी योजना राबविले जातात. विद्यार्थ्यांना, संशोधकांना जास्तीत जास्त शैक्षणिक सुविधा पुरविण्यासाठी शैक्षणिक संस्था व विद्यापीठ प्रशासन अनेक विभागाच्या नवीन इमारती उभारुन रस्ते, पाणी-पुरवठा, विद्युतीकरण यांच्यासह इतर मुलभुत सुविधा देण्यासाठी सतत प्रयत्नशिल असते. याबरोबरच या परिसरात विविध भागातून शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृह सुध्दा उभारलेली असल्याचे खा. इम्तियाज जलील यांनी पंतप्रधानांना दिलेल्या पत्रात नमुद केले आहे.

Deshonnati Edition
Apr 17, 2022 Page No. 2
Powered by : eReleGo.com

## दिनांक १७ एप्रिल २०२२
## मिलिंद महाविद्यालयाची दुरावस्था

दिनांक ०३ एप्रिल २०२२ रोजी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे प्रदेश महासचिव संतोष शिंदे यांनी खासदार इम्तियाज जलील साहेब यांची औरंगाबाद येथील त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली असता साहेबांना डॉ.बाबासाहेब आंबडकर यांनी औरंगाबाद येथे स्थापन केलेल्या मिलिंद महाविद्यालयाची झालेली दुरावस्था याबद्दल चर्चा केली व राज्य व केंद्र सरकारकडे पाठपुरावा करून मिलिंद महाविद्यालयासाठी निधी आणून महाविद्यालयाची होत असलेली दुरावस्था थांबवावी अशी विनंती केली होती त्याची तात्काळ दखल घेत १६ एप्रिल २०२२ रोजी भारताचे पंतप्रधान नरेन्द्र मोदी साहेब यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केली त्याची वृत्तपत्रांनी घेतलेली दखल







## दिनांक २० एप्रिल २०२२

## रोजगार भरती कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद..

क्रांतिसूर्य महात्मा फुले व भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि बाणाई आयोजित रोजगार भरती मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आगामी काळात ही युवकांना रोजगार मिळण्याकरिता कार्यरत राहू यावेळी जनसंपर्क अधिकारी किरण गायकवाड, बाणाई चे उप अभियंता विजय कांबळे, रयत विद्यार्थी विचार मंच चे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे,प्रदेश महासचिव संतोष शिंदे ,विजय ओव्हाळ









## दिनांक १ मे २०२२
## महाराष्ट्र व कामगार दिन

रयत विद्यार्थी विचार मंच मुंबई प्रदेश,ठाणे,कल्याण कार्यकारणीला भेट देण्यासाठी दौरा आयोजित केला होता.यावेळी महाराष्ट्र दिन व कामगार दिनाचे औचित्य साधून चैत्यभूमी दादर या ठिकाणी कामगारांचे उद्धारकर्ते,महान कामगार नेते भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना रयत विदयार्थी विचार मंच संस्थेच्या पूर्ण टीमच्या वतीने अभिवादन करण्यात आले व सर्वांना महाराष्ट्र दिनाच्या व कामगार दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या..








## दिनांक ०६ मे २०२२
## लोकराजा शाहूमहाराज स्मृतीशताब्दी

लोकशाहीवादी राजा,आरक्षणाचे जनक,शिक्षणाला महत्व देऊन शाळा,हॉस्टेल याची निर्मिती करणारे,स्वातंत्र्य समता बंधुता प्रस्थापित करून जातिभेदाचा नायनाट करणारा,बाबासाहेब आंबेडकर यांचा पाठीराखा असा सर्व रयतेचा राजा राजर्षी शाहू महाराज यांच्या स्मृती शताब्दी निम्मित चिंचवड येथील त्यांच्या पुतळयाला सकाळी १० वाजता रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने १०० सेकंद स्तब्ध उभे राहून मानवंदना दिली व अभिवादन केले.









## दिनांक ११ मे २०२२

## तृतीयपंथी घटकांसाठी क्रांतिकारी ऐतिहासिक पाऊल

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने तृतियपंथी लोकांना सन्मानाने समाजात जगता यावे,त्यांचे जीवनमान उंचवावे,तृतीयपंथी लोकांना समाजात प्रतिष्ठा लाभावी याकरिता तृतीयपंथी यांना दरमहा 3 हजार पेन्शन, महापालिकेत नोकरी,वायसीएम रुग्णालयात २ बेड्चे स्वतंत्र कक्ष,ग्रीन मार्शल पथकात नेमणूक,सुरक्षारक्षक म्हणून नोकरी,महापालिकेची दोन उद्याने चालविण्यास संधी,आणि तृतीयपंथीयास स्वतंत्र्य शौचालय उभारणार.दुर्लक्षित असलेल्या घटकाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी हे क्रांतिकारी व ऐतिहासिक पाऊल उचलून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने नाव केवळ राज्यात नाही तर देशातील एकमेव महानगरपालिका म्हणून सार्थ ठरवले आहे.याकरिता रयत विद्यार्थी विचार मंच संस्था व रामा तृतीयपंथी संस्थेच्या वतीने पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त मा.राजेश पाटील यांना अभिनंदनपर पत्र व भारतीय संविधानाची प्रास्ताविका देऊन सत्कार करण्यात आला. व मा.उपायुक्त विकास ढाकणे,जनसंपर्क अधिकारी किरण गायकवाड सर, मा. नागरवस्ती विभाग अधिकारी अजय चारठणकर यांना पुष्पगुच्छ देऊन सत्कार व अभिनंदन करण्यात आले.



**पिंपरी :** रामा तृतीयपंथी दक्षता सामाजिक संस्थेच्या वतीने पालिका आयुक्त राजेश पाटील यांचा पुष्पगुच्छ, भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेची प्रत आणि शाल देऊन अभिनंदन केले.

# तृतीयपंथीयांकडून आयुक्तांचा सत्कार

**पिंपरी, दि. १२ (प्रतिनिधी)** - समाजातील दुर्लक्षित असलेल्या तृतीयपंथी घटकाला स्वाभिमानी आणि स्वावलंबी बनविण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेने घेतलेले निर्णय परिवर्तनवादी आणि क्रांतीकारी आहेत. महापालिकेचे हे काम कौतुकास्पद असून आम्हाला माणूस म्हणून सन्मान मिळवून देण्यासाठी पुढाकार घेणाऱ्या महापालिकेचे आम्ही मनापासून अभिनंदन करत आहोत, अशा शब्दांत तृतीयपंथी प्रतिनिधींनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

पालिकेने तृतीयपंथियांसाठी विविध योजना सुरू करण्याचा निर्णय घेतला. आयुक्त तथा प्रशासक राजेश पाटील यांनी नुकतीच विविध योजनांना मंजुरी देऊन त्या योजना जाहीर केल्या. या पार्श्वभूमीवर तृतीयपंथीय प्रतिनिधींनी आयुक्त पाटील यांचे पुष्पगुच्छ, भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेची प्रत आणि शाल देऊन अभिनंदन केले. रामा तृतीयपंथी दक्षता सामाजिक संस्था, रयत विद्यार्थी विचार मंच आदी संघटनांनी आयुक्त राजेश पाटील यांची महापालिका मुख्य प्रशासकीय कार्यालयात प्रत्यक्ष भेट घेऊन अभिनंदन केले. यावेळी आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, जनसंपर्क अधिकारी किरण गायकवाड उपस्थित होते.

यामध्ये तृतीयपंथी संघटनेच्या आशा देसले, रामा तृतीयपंथी दक्षता सामाजिक संस्थेचे अध्यक्ष रामा भोरकडे, खजिनदार निलेश पवार, तृतीयपंथी सदस्य सिद्धी कुंभार, रोहिणी परमार, अनुष्का मंजाळ, अनु जगताप, शनया यांचा समावेश होता.

**प्रभात** Fri, 13 May 2022
https://epaper.eprabhat.net/c/67996084

# तृतीयपंथींकडून प्रशासकांचा सत्कार

**पिंपरी, ता. १२ :** तृतीयपंथी घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध योजना सुरू केल्याबद्दल तृतीयपंथी प्रतिनिधींनी प्रशासक राजेश पाटील यांचा सत्कार केला. सर्वांनी मिळून त्यांना पुष्पगुच्छ, भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेची प्रत आणि शाल दिली.

यावेळी तृतीयपंथी संघटनेच्या आशा देसले, रामा तृतीयपंथी दक्षता सामाजिक संस्थेचे अध्यक्ष रामा भोरकडे, खजिनदार नीलेश पवार, सदस्य सिद्धी कुंभार, रोहिणी परमार, अनुष्का मंजाळ, अनु जगताप, शनया, रयत विद्यार्थी संघटनेचे धम्मराज साळवे, संतोष शिंदे, अमर मुनेश्वर, मयूर जगताप, प्राजक्ता गायकवाड, प्रगती कोपरे, अभिजित लगाडे, समाधान गायकवाड उपस्थित होते.



**विविध योजना लागू केल्याबद्दल महापालिका प्रशासक राजेश पाटील यांचा सत्कार करताना तृतीयपंथी.**

**आम्ही तृतीयपंथी समता, न्याय, बंधुता यापासून नेहमीच वंचित राहिलो. आमच्या पदरी नेहमी उपेक्षा, अपमान, दारिद्र्य हेच आले. भारतीय संविधानाने आम्हाला माणूस म्हणून स्वीकारले, आमचे हक्क अधिकार मान्य केले. परंतु समाजाने आम्हाला नाकारले. मात्र, महापालिका प्रशासक राजेश पाटील यांनी समाजातील दुर्लक्षित तृतीयपंथी घटकाला स्वाभिमानी आणि स्वावलंबी बनविण्यासाठी धाडसी ऐतिहासिक निर्णय घेतला आहे, यामुळे ते अभिनंदनास पात्र आहेत.**

**-रामा,** तृतीयपंथी दक्षता सामाजिक संस्था

पुढारी



आयुक्त राजेश पाटील यांचा सत्कार करताना तृतीयपंथी.

# आयुक्त राजेश पाटील यांचा तृतीयपंथीयांकडून गौरव

**पिंपरी : पुढारी वृत्तसेवा**

समाजातील दुर्लक्षित असलेल्या तृतीयपंथी घटकाला स्वाभिमानी व स्वावलंबी बनविण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेने घेतलेले निर्णय परिवर्तनवादी व क्रांतिकारी आहेत. पालिकेचे हे काम कौतुकास्पद आहे. आम्हाला माणूस म्हणून सन्मान मिळवून देण्यासाठी पुढाकार घेणाऱ्या पालिकेचे आभारी आहोत, अशा शब्दांत शहरातील तृतीयपंथीयांनी भावना बुधवारी (दि.११) व्यक्त केल्या.

पालिकेने तृतीयपंथी घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध योजनांची आयुक्त तथा प्रशासक राजेश पाटील यांनी मंगळवारी (दि.११) घोषणा केली. या पार्श्वभूमीवर तृतीयपंथीय प्रतिनिधींनी आयुक्त पाटील यांचे भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेची प्रत व पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. त्यावेळी तृतीयपंथीयांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

रामा तृतीयपंथी दक्षता सामाजिक संस्था व रयत विद्यार्थी विचार मंचाने आयुक्त पाटील यांचे अभिनंदन केले. यावेळी तृतीयपंथी संघटनेच्या आशा देसले, रामा भोरकडे, निलेश पवार, सिद्धी कुंभार, रोहिणी परमार, अनुष्का मंजाळ, अनु जगताप, शनया, धम्मराज साळवे आदी समावेश होता. पालिकेने सामाजिक न्यायाच्या दृष्टीने ऐतिहासिक पाऊल उचलून उपेक्षित घटकांना समतेची वागणूक आणि त्यांचे न्याय हक्क अधिकार देण्याचे स्तुत्य काम केले आहे, असे प्रतिनिधींनी सांगितले.

Pimpri Edition
May 12, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

## दिनांक १३ मे २०२२

तृतीयपंथी घटकासाठी सन्मान जनक योजना लागू केल्याबद्दल प्रशासक तथा आयुक्त आणि प्रशासन यांचा रयत विद्यार्थी विचार मंच आणि रामा तृतीयपंथी दक्षता समिती यांच्या वतीने केलेल्या सन्मानाची वृत्तपत्रांनी घेतलेली दखल






**दिनांक २९ मे २०२२**

**मा.गृहमंत्री दिलीपराव वळसे पाटील यांचा सन्मान**

रयत शिक्षण संस्थेचे पिंपरी महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पांडुरंग गायकवाड सर यांचा सेवानिवृत्ती गौरव सोहळा रामकृष्ण मोरे पेक्षागृह चिंचवड या ठिकाणी आयोजित करण्यात आला होता. रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने मा.गृहमंत्री दिलीपराव वळसे पाटील यांचा सन्मान संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर यांनी केला व प्राचार्य पांडुरंग गायकवाड सर यांना सन्मानपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

सकाळ



प्राचार्य डॉ. पांडुरंग गायकवाड यांचा सेवापूर्तीनिमित्त सत्कार करताना राज्याचे गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील.

# प्राचार्य डॉ. पांडुरंग गायकवाड यांचा सेवानिवृत्तीनिमित्त गौरव सोहळा

**पिंपरी, ता. ३० :** रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पांडुरंग गायकवाड यांचा सेवानिवृत्ती निमित्त गौरव सोहळा झाला. राज्याचे गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी माजी महापौर उषा ढोरे होत्या. चिंचवड येथील प्राध्यापक रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात कार्यक्रम झाला. वळसे पाटील म्हणाले, ''गायकवाड यांचे जीवन खऱ्या अर्थाने अध्यात्मिक व शैक्षणिक दृष्ट्या समृध्द आहे. त्यांनी सेवानिवृत्तीनंतरही कार्यरत रहावे. समाजपयोगी कामे, अध्यात्मिक कार्य करत रहावे.'' यावेळी गौरव समिती, महात्मा फुले महाविद्यालय माजी विद्यार्थी संघटना व रयत विचार मंच यांनी स्वतंत्रपणे त्यांना मानपत्र प्रदान केले. यानंतर अॅड. राम कांडगे, डॉ. प्रतिक गायकवाड यांनी भाषणे झाली. निमंत्रक संजोग वाघेरे पाटील यांनी स्वागत केले. डॉ. श्रीरंग गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. उपप्राचार्य शहाजी मोरे यांनी आभार मानले.

Pune, PCMC-Today
31/05/2022 Page No. 4



# आंतरजातीय विवाह योजनेला माईसाहेबांचे नाव द्या

**रयत विद्यार्थी विचार मंचची मुख्यमंत्र्यांकडे मागणी**

पिंपरी, दि. २९ (प्रतिनिधी) - सविता ऊर्फ माईसाहेब आंबेडकर या बाबासाहेबांच्या द्वितीय पत्नी होत्या. माईंचे घराणे पुरोगामी आणि जातीपातीला मूठमाती देणारे होते. त्यामुळे सध्या सुरू असलेल्या आंतरजातीय विवाह योजनेला माईसाहेब आंबेडकर असे नाव देण्यात यावे, अशी मागणी रयत विद्यार्थी विचार मंचचे अध्यक्ष धम्मराज साळवे यांनी केली आहे. याबाबत त्यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व सामाजिक न्यायमंत्री धनजंय मुंडे यांना पत्र दिले आहे.

त्यानुसार, माईसाहेब आंबेडकर यांचा जन्म एका मराठी सारस्वत ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांचे माहेरचे नाव शारदा कबीर होते. त्यांचे वडील कृष्णराव कबीर इंडियन मेडिकल काउन्सिलचे रजिस्ट्रार होते. कृष्णरावांना पाच मुली व तीन मुले होती. या एकूण आठ मुलांपैकी ६ भावंडांचा विवाह आंतरजातीय झाला. अगदी जातीपातीच्या काळात माईंचे घराणे पुरोगामी आणि जातीपातीला मूठमाती देणारे होते. अशा पुरोगामी विचाराच्या असणाऱ्या माईसाहेब आंबेडकर यांनी देखील बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी आंतरजातीय विवाह करून एक आदर्श निर्माण केला.

माईसाहेब आंबेडकर यांचे निधन झाल्यांनतर तत्कालीन महाराष्ट्र सरकारने आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना सरकारी नोकरीत प्राधान्य देण्याची डॉ. सविता आंबेडकर यांच्या नावाची योजना आखली होती. या योजनेनुसार अशा दांपत्याला १५ हजार रुपये रोख आणि अपत्यांच्या नावाने बँकेत १ लाख रुपये ठेवले जातील. तसेच मुलांच्या शिक्षणासाठी आर्थिक मदत केली जाईल, अशी तरतूद होती. परंतु या योजनेचे पुढे काहीही झाले नाही. २९ मे सविता उर्फ माईसाहेब आंबेडकर यांचा स्मृतिदिन यानिमित्ताने महाराष्ट्र सरकारने माईंच्या याच विचारांचा व कार्याचा आदर्श घेत सध्या चालू असलेल्या आंतरजातीय विवाह योजनेला माईसाहेबांचे नाव द्यावे, अशी मागणी केली आहे.

प्रभात Mon, 30 May 2022 https://epaper.eprabhat.net

दिनांक ३० मे २०२२

आंतरजातीय विवाह योजनेला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी डॉ. माईसाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यासंदर्भात रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे मुख्यमंत्र्यांना निवेदन त्याची दैनिक प्रभातने घेतलेली दखल.



## दिनांक ३१ मे २०२२
## पुण्यशलोक अहिल्यादेवी होळकर जयंती

पुण्यशलोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने अभिवादन करण्यात आले.यावेळी संस्थेच्या प्रदेश सहसचिव भाग्यश्री आखाडे,पिंपरी चिंचवड शहर सचिव प्रगती कोपरे मॅडम यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले.यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर,प्रदेश महासचिव संतोष शिंदे,पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष मयूर जगताप,शहर उपाध्यक्ष समाधान गायकवाड,शहर संघटक अभिजित लगाडे उपस्थित होते.



दैनिक लोक सह्याद्री

dailyloksahyadri www.loksahyadri.com dailyloksahyadri@gmail.com epaper.loksahyadri.com\ 9423811610

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांना रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्यावतीने अभिवादन

पिंपरी चिंचवड/सिध्दांत चौधरी : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने अभिवादन करण्यात आले.यावेळी संस्थेच्या प्रदेश सहसचिव भाग्यश्री आखाडे,पिंपरी चिंचवड शहर सचिव प्रगती कोपरे मॅडम यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष मयूर जगताप यांनी असे मत व्यक्त केले की ज्याप्रमाणे अहिल्यादेवी होळकर यांनी प्रजेचे हित लक्षात घेऊन राज्यकारभार केला त्याप्रमाणे आजच्या राज्यकर्त्यांनी माता अहिल्यादेवी होळकर यांचा आदर्श घेतला पाहिजे व त्यांच्या विचाराप्रमाणे राज्यकारभार केला पाहिजे

यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर,प्रदेश महासचिव संतोष शिंदे,पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष मयूर जगताप,शहर उपाध्यक्ष समाधान गायकवाड,शहर संघटक अभिजित लगाडे उपस्थित होते.

Main Edition
Jun 3, 2022 Page No. 3
Powered by : eReleGo.com



लोकमत

### अहिल्यादेवींना होती रयतेची काळजी : धम्मराज साळवे

पिंपरी : पुण्यशलोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्यावतीने अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्थापक-अध्यक्ष धम्मराज साळवे, भाग्यश्री आखाडे, प्रगती कोपरे, मयूर जगताप, संतोष शिंदे, मयूर जगताप, समाधान गायकवाड, अभिजित लगाडे आदी उपस्थित होते.

धम्मराज साळवे म्हणाले, अहिल्यादेवींनी रयतेच्या काळजीपोटी अनेक गोष्टी केल्या. शेतकरी सुखी, तर जग सुखी या संकल्पनेतून शेतकऱ्यांना जाचक करातून मुक्त केले. अनेक ठिकाणी तलाव व विहिरी बांधल्या.

Hello Pimpri Chinchwad
Page No. 4 Jun 01, 2022
Powered by: erelego.com





रयत शिक्षण संस्थेचे,

**महात्मा फुले महाविद्यालय**

पिंपरी, पुणे - ४११ ०१७.

नॅक तृतीय मूल्यांकन 'A' ग्रेड (CGPA : 3.16)

**संस्थापक : पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे. नोंदणी क्र. : आय.डी.पी.यु/पी.एन./ए.सी.एस./०५३-(१९८३)
ज्युनिअर कॉलेज कोड नं.: जे.११.१६००८
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१. नं.: एवएस/२/पीडी/९०-९१ दि.१३-१२-९०
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक केंद्र क्र. : ६२०६ ए

"स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद"
कर्मवीर

प्राचार्य
डॉ. पांडुरंग नि. गायकवाड
एम.ए., बी.एड., पीएच.डी.

जा.क्र. 135/2022-23 दि. 31-05-2022

**शुभेच्छा पत्र**

मा. धम्मराज साळवे व सर्व पदाधिकारी......

महाराष्ट्रातील कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये, हे ध्येय बाळगून आपण 'रयत विद्यार्थी विचार मंच' संस्थेची २०१७ साली स्थापना केली. आपण छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, राजर्षी शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा विद्यार्थी घडविण्यासाठी सतत प्रयत्नशील आहात.

आज अनेक विद्यार्थ्यांना परिस्थितीमुळे शिक्षण घेता येत नाही किंवा आर्थिक अडचणींमुळे शिक्षण सोडावे लागते अशा विद्यार्थ्यांना आपण संस्थेच्या माध्यमातून शैक्षणिक पाठबळ देण्याचे काम करत आहात.

मला सांगण्यास अतिशय आनंद होत आहे की, मी सध्या कार्यरत असलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले महाविद्यालयाचे आपण माजी विद्यार्थी आहात आणि याच महाविद्यालयात शिक्षण घेत असताना आपण 'रयत विद्यार्थी विचार मंच' संस्थेची संकल्पना प्रत्यक्षात आणली.

'रयत विद्यार्थी विचार मंच' चा विस्तार संपूर्ण महाराष्ट्रभर होत आहे याचा मला अभिमान आहे. गरीब, गरजू विद्यार्थ्यांना आपण करत असलेले मदतकार्य उल्लेखनीय व कौतुकास्पद आहे. पुढील काळात देखील आपले हे कार्य अविरतपणे सुरू रहावे यासाठी हार्दिक शुभेच्छा !

प्राचार्य
महात्मा फुले महाविद्यालय
पिंपरी, पुणे - ४११ ०१७.

फोन - ऑफिस : (०२०) २७४१२००७ / प्राचार्य केबिन : (०२०) २७४१०३३४
ई-मेल : mahatmaphulepimpri@yahoo.com प्राचार्य ई-मेल : gaikwadpn@gmail.com
वेबसाईट : https://www.mpcollegepimpri.edu.in/

**दिनांक ३१ मे २०२२**
**संस्थेच्या कार्याला शुभेच्छा**
**धन्यवाद प्राचार्य पांडुरंग गायकवाड सर**

रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य पांडुरंग गायकवाड सर यांनी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या कार्याचे कौतुक करत शुभेच्छापत्र दिले.












दिनांक ०१ जून २०२२
पिंपरी चिंचवड शहरातील
गरजू विद्यार्थ्यांना
शैक्षणिक साहित्याची मदत

# विद्यापीठाच्या बोधचिन्हात सावित्रीबाईंची मुद्रा घ्यावी

**सामाजिक संघटनांची मागणी : आज बैठकीचे आयोजन**

**पिंपरी, दि. २३ (प्रतिनिधी)** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या बोधचिन्हात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची मुद्रा घ्यावी, अशी मागणी विविध सामाजिक संघटनांकडून होत आहे. यासाठी चिंचवडमध्ये शुक्रवारी (दि. २४) एका बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

पुणे विद्यापीठाला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे नाव देण्यात आले आहे. मात्र विद्यापीठाच्या बोधचिन्हात सावित्रीबाई फुले यांची मुद्रा नाही. बोधचिन्हात सावित्रीबाई फुले यांची मुद्रा घ्यावी या मागणीसाठी पिंपरी चिंचवड शहरातील पुरोगामी संघटनांचे प्रतिनिधी यांची बैठक आयोजित केली आली आहे.

या बैठकीला मानव कांबळे, काशिनाथ नखाते, प्रकाश जाधव, आनंदा कुदळे, बाबा कांबळे, प्रतापराव गुरव, सतिश काळे, ॲड. मनिषा महाजन, हनुमंत माळी, धनाजी येळकर, नीरज कडू, प्रल्हाद कांबळे, धम्मराज साळवे, सिद्दीक शेख, संतोष जोगदंड, मारुती भापकर, विशाल जाधव, मनोज गजभार यांच्यासह अनेक सामाजिक कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

शुक्रवार (दि. २४) सायंकाळी ५.३० वाजता ही बैठक चिंचवडमधील दर्शन हॉलजवळ असलेल्या दिनकर गजाबा भोईर व्यायाम शाळेत, माणिक कॉलनी होणार आहे. डॉ. भारत पाटणकर हे या बैठकीत मार्गदर्शन करणार आहेत.

प्रभात Fri, 24 June 2022
https://epaper.eprabhat.net/c/68798165

**दिनांक २४ जुन २०२२**

सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या बोधचिन्हात क्रांतीजोती सावित्रीबाई फुले यांची मुद्रा घेण्यात यावी याकरिता बैठकीचे आयोजन










## दिनांक २५ जुन २०२२
## संस्थेच्या अधिकृत वेबसाईटचे उद्घाटन

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या अधिकृत वेबसाईटचे उद्घाटन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे सन्माननीय आयुक्त मा.राजेश पाटील सर यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी संस्थेचे कार्य व वेबसाईट यासंदर्भात संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर यांनी सन्माननीय आयुक्त सर यांना माहिती दिली.सन्माननीय आयुक्त मा.राजेश पाटील सर यांनी संस्थेच्या कार्याचे कौतुक करत सर्व पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने मा.आयुक्त राजेश पाटील सर यांना " संविधानाच्या स्वप्नातील गाव " हे पुस्तक व पुष्पगुच्छ  देऊन आयुक्त सरांचा सन्मान केला.

मुकुंद इंजिनिअर्स

दैनिक **दायित्व**

LUBNA TRADERS

## रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळाचे उद्घाटन



**पिंपरी :** रयत विद्यार्थी विचार मंच संस्था शिक्षण शेत्रात सातत्याने कार्यरत आहे.संस्थेच्या माध्यमातून शैक्षणिक अडचणी सोडवल्या जातात.गरीब गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत केली जाते.

होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत व्हावी, विद्यार्थ्यांना शैक्षणिक योजनांची माहिती मिळावी,रयत विद्यार्थी विचार मंच करत असेलेले कार्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहचावे या उद्देशाने रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या संकेतस्थळाची निर्मिती करण्यात आली. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त राजेश पाटील सर यांच्या हस्ते रयत विद्यार्थी मंच संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी संस्थेच्या कार्याची व संकेतस्थळाची माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर यांनी आयुक्त राजेश पाटील सर यांना दिली.

यावेळी आयुक्त राजेश पाटील सर यांनी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या कार्याचे कौतुक करत असे मत व्यक्त केले की विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व शैक्षणिक विकासासाठी एकत्र आले पाहिजे

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेने असेच होतकरू विद्यार्थ्यांना पाठबळ देऊन विद्यार्थ्यांना घडवण्याचे काम करावे याकरिता संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांच्या वतीने आयुक्त राजेश पाटील सर यांना ' संविधानाच्या स्वप्नातील गाव' हे पुस्तक व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

# रयत विद्यार्थी मंचच्या संकेतस्थळाचे उद्‌घाटन

**पिंपरी, दि. २६ (प्रतिनिधी)** - रयत विद्यार्थी विचार मंच संस्था शिक्षण शेत्रात कार्यरत आहे. संस्थेच्या माध्यमातून शैक्षणिक अडचणी सोडवल्या जातात. गरीब गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत केली जाते. होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत व्हावी, विद्यार्थ्यांना शैक्षणिक योजनांची माहिती मिळावी, यासाठी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या संकेतस्थळाची निर्मिती करण्यात आली. या संकेतस्थळाचे उद्‌घाटन महापालिका आयुक्त राजेश पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे, प्रदेश महासचिव संतोष शिंदे, सहसचिव भाग्यश्री आखाडे, मावळ तालुका प्रमुख अतुल वाघमारे, लोणावळा शहर प्रमुख प्रणाली कावरे, सोनल म्हसकर, पिंपरी चिंचवड शहर कमिटीचे शहराध्यक्ष मयूर जगताप, प्रभारी अध्यक्ष अभिजित साळुंखे, शहर सचिव प्रगती कोपरे, कार्याध्यक्ष योगेश कांबळे, संघटक अभिजित लगाडे, सदस्य माधवी खरात आदी पदाधिकारी उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी Www.Rayatvvm.org हे संकेतस्थळ सुरू करण्यात आले आहे. तर ८६२४८६६४६४ हा संस्थेचा अधिकृत व्हॉटसअप क्रमांक जाहीर करण्यात आला आहे.

प्रभात Mon, 27 June 2022 https://epaper.eprabhat.net






## दिनांक २६ जुन २०२२
## लोकराजा छत्रपती शाहू महाराज जयंती

रयत विद्यार्थी विचार मंच पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने संस्थेच्या संपर्क कार्यालयात छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी धम्मराज साळवे सर व प्रगती कोपरे मॅडम यांच्या हस्ते छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले .

सोमवार, दि. २७ जून २०२२ ३

## रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने छत्रपती शाहू महाराज यांना जयंतीनिमित्त अभिवादन



**पिंपरी :** रयत विद्यार्थी विचार मंच पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने संस्थेच्या पिंपरी येथील संपर्क कार्यालयात छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी धम्मराज साळवे सर व प्रगती कोपरे मॅडम यांच्या हस्ते छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले. याप्रसंगी संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर यांनी असे मत व्यक्त केले की छत्रपती शाहू महाराज यांनी कोल्हापूर मध्ये मुस्लिम बोर्डिंग, जैन बोर्डिंग, लिंगायत बोर्डिंग अश्या सर्वच जातीधर्मातील विद्यार्थ्यांसाठी बोर्डिंग चालू केल्या व विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास केला. तोच शिक्षणाचा विचार घेऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानात मांडला असे मत धम्मराज साळवे सर यांनी व्यक्त केले.

यावेळी महासचिव संतोष शिंदे, पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष मयुर जगताप, प्रदेश अध्यक्ष अभिजित साळुंखे, संघटक अभिजीत लगाडे,शहर सचिव प्रगती कोपरे मॅडम,संपर्क प्रमुख स्वराज कांबळे हे उपस्थित होते.

## छत्रपती शाहू महाराज यांना जयंतीनिमित्त अभिवादन

**पिंपरी, दि. २८ (प्रतिनिधी) -** रयत विद्यार्थी विचार मंच पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने संस्थेच्या पिंपरी येथील संपर्क कार्यालयात छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. या वेळी धम्मराज साळवे व प्रगती कोपरे यांच्या हस्ते छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी संस्थापक अध्यक्ष साळवे म्हणाले, छत्रपती शाहू महाराज यांनी कोल्हापूरमध्ये मुस्लिम बोर्डिंग, जैन बोर्डिंग, लिंगायत बोर्डिंग अशा सर्वच जातीधर्मातील विद्यार्थ्यांसाठी बोर्डिंग चालू केल्या व विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास केला. तोच शिक्षणाचा विचार घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानात मांडला असे मत धम्मराज साळवे यांनी व्यक्त केले. या वेळी महासचिव संतोष शिंदे, पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष मयूर जगताप, प्रदेश अध्यक्ष अभिजित साळुंखे, संघटक अभिजित लगाडे, शहर सचिव प्रगती कोपरे, संपर्क प्रमुख स्वराज कांबळे हे उपस्थित होते.

प्रभात Wed, 29 June 2022 https://epaper.eprabh








## दिनांक ०४ जुलै २०२२
## विद्यार्थी करिअर मार्गदर्शन

पिंपरी चिंचवड एज्युकेशन सोसायटीच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मारक सभागृहात करिअर मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला या कार्यक्रमास रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर उपस्थित होते.

# करिअर मार्गदर्शनास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पिंपरी, दि. ४ (प्रतिनिधी)** - पिंपरी चिंचवड एज्युकेशन सोसायटीच्या वतीने दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या करिअर मार्गदर्शनास विद्यार्थी आणि पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मारक सभागृहात हा कार्यक्रम झाला.

या वेळी निवृत्त पोलीस अधीक्षक जलील शेख, निवृत्त पोलीस अधिकारी गुलाम मोहम्मद शेख, सहायक शिक्षण अधिकारी रजिया खान, रयत विद्यार्थी विचार मंच अध्यक्ष धम्मराज साळवे, महासचिव संतोष शिंदे, एमआयएम महिला शहराध्यक्ष रुहीनाज शेख, लतीफ सय्यद, अल्ताफ शेख, इम्तियाझ खान, अकिब शेख आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी अनुभवातून शिक्षण घ्यावे. शिक्षण हा एकमेव प्रगतीचा मार्ग आहे. आयुष्यातील संकटावर मात करत शिक्षणाच्या आधारे आपले जीवन सुखकर करावे, असे मत पिंपरी चिंचवड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अकील मुजावर यांनी व्यक्त केले. या वेळी अमजद खान, नौशाद शेख यांनी शिक्षणाच्या विविध संधी कशा निवडाव्यात या विषयी मार्गदर्शन केले. गुणवंत विद्यार्थीना सन्मान चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

प्रभात Tue, 05 July 2022 https://epaper.epi

लोकमत

# विद्यार्थ्यांना करिअरबाबत पिंपरीत केले मार्गदर्शन

## गुणवंत मुलांना केले सन्मानित

लोकमत न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड एज्युकेशन सोसायटीच्या वतीने क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मारक सभागृहात करिअर मार्गदर्शन झाले.

यामध्ये मार्गदर्शक अमजद खान, नौशाद शेख यांनी विद्यार्थ्यांना यशस्वी होण्यासाठी शिक्षणाच्या विविध संधी कशा निवडाव्यात, याचे मार्गदर्शन केले. या वेळी गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

विद्यार्थ्यांनी नेहमी अनुभवातून शिक्षण घ्यावे. शिक्षण हा एकमेव प्रगतीचा मार्ग आहे. योग्य शिक्षण आणि उच्च ध्येय प्रत्येक विद्यार्थ्याने बाळगले पाहिजे. आयुष्यातील संकटावर मात करत शिक्षणाच्या आधारे आपले जीवन सुखकर करावे, असे मत पिंपरी चिंचवड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अकील मुजावर यांनी व्यक्त केले.

पिंपरी- चिंचवड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अकील मुजावर, निवृत्त पोलीस अधीक्षक जीएसटी जलील शेख, निवृत्त पोलीस अधिकारी गुलाम मोहम्मद शेख, सहायक शिक्षण अधिकारी रजिया खान, रयत विद्यार्थी विचारमंच अध्यक्ष धम्मराज साळवे, संतोष शिंदे, रुहिनाज शेख, उमर मुजावर आदी उपस्थित होते.

सद्दाम हुसेन यांनी सूत्रसंचालन केले. गुलाम मोहम्मद शेख यांनी प्रस्तावना केली. शफिउल्ला काझी यांनी आभार मानले.

या वेळी मुलांनी मनोगत व्यक्त केले. तसेच करिअर मार्गदर्शन उपक्रमाबाबत समाधन व्यक्त केले.

Hello Pimpri Chinchwad
Page No. 5 Jul 05, 2022
Powered by: erelego.com

**दिनांक ०५ जुलै २०२२**





दिनांक ०५ जुलै २०२२

पिंपरी गांधीनगर येथील गरीब गरजू विद्यार्थ्यांना रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने शैक्षणिक साहित्य देण्यात आले.








## दिनांक २० जुलै २०२२
## शैक्षणिक साहित्य वाटप

पंचशील बुद्ध विहार याठिकाणी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने नेहरूनगर पिंपरी या भागात सफाई काम करणाऱ्या महिला कामगारांच्या मुलांकरिता शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर,प्रदेश महासचिव संतोष शिंदे,सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र साळवे,मनोज गजभार उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांसाठी उद्या करिअर मार्गदर्शन

पिंपरी, दि. ५ (प्रतिनिधी) - रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने दहावी व बारावी गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ व करिअर मार्गदर्शन कार्यक्रम येत्या रविवारी (दि. ७) आयोजित करण्यात आला आहे.

पिंपरी येथील कामगार भवनाशेजारील क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मारक येथे सकाळी १०.३० वाजता हा कार्यक्रम होणार आहे. या वेळी दहावी व बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. तसेच पिंपरी चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप, पोलीस उपायुक्त परिमंडळ १ चे मंचक इप्पर, जनसंपर्क अधिकारी किरण गायकवाड हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे स्वागत अध्यक्ष धम्मराज साळवे असतील. या वेळी विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र तसेच विद्यार्थ्यांना पर्यावरणाचे महत्त्व कळावे या उद्देशाने विविध रोप देण्यात येणार आहेत.

प्रभात Sat, 06 Augus
https://epape

दिनांक ०६ ऑगस्ट २०२२








रयत विद्यार्थी विचार मंच (महा.राज्य)


र्थी विचार मंच (महा.राज्य)








रयत विद्यार्थी विचार मंच (महा.राज्य)








रयत विद्यार्थी विचार मंच (महा.राज्य)
१० वी व १२ वी गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ
व करिअर मार्गदर्शन २०२२






रयत विद्यार्थी विचार मंच (महा.राज्य)







## दिनांक : ०८ ऑगस्ट २०२२
## गुणवंत विद्यार्थी सत्कार करिअर मार्गदर्शन

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ २०२२ पार पडला.कार्यक्रमास प्रमुख पाहुणे पिंपरी चिंचवड शहराचे पोलीस उपायुक्त मा. मंचक ईप्पर साहेब,पिंपरी चिंचवड महानगपालिकेचे उपायुक्त मा.उल्हास जगताप साहेब,पिंपरी चिंचवड महानरपालिकेचे जनसंपर्क अधिकारी मा.किरण गायकवाड सर तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर उपस्थित होते. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना सर्व मान्यवर यांनी करिअर संदर्भात मार्गदर्शन केले तसेच १० व १२ वी गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पिंपरी चिंचवड शहर महासचिव प्राजक्ता गायकवाड,कार्यक्रमाची प्रस्तावना प्रदेश महासचिव संतोष शिंदे,रयत संस्थेची भूमिका पिंपरी चिंचवड शहर प्रभारी अध्यक्ष अभिजित साळुंखे व  आभार प्रदर्शन प्रगती कोपरे यांनी केली.

Reg. No. : MH-25-0006899
रिपब्लिकन आवाज
बातम्या ! विश्लेषण ! बरच काही
संपादक : अमोल एल. डंबाळे
web : www.republicanaawaj.com Email : republicanaavaj@gmail.com 9028 633 644 Digital

# रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने दहावी व बारावी गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ व करिअर मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात संपन्न





**रिपब्लिकन आवाज न्युज**

पिंपरी : प्रतिनिधी

रयत विद्यार्थी विचार मंच संस्था ही विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाकरिता व शैक्षणिक मदती करिता सातत्याने कार्यरत आहे.संस्थेच्या वतीने रविवार दिनांक ०७ ऑगस्ट २०२२ रोजी सकाळी १०:३० वाजता क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मारक,कामगार भवन शेजारी पिंपरी येथे दहावी व बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता.

सदर कार्यक्रमासाठी व विद्यार्थ्यांना करिअर संदर्भात मार्गदर्शन करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त.३ उल्हास जगताप तसेच पिंपरी चिंचवड शहराचे पोलीस उपायुक्त परिमंडळ.१ मंचक इप्पर साहेब, पिंपरी चिंचवड महानगरपालिका जनसंपर्क अधिकारी किरण गायकवाड हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते तसेच रयत विद्यार्थी विचार मंच संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते . या कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांनी व पालकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला यावेळी ६० पेक्षा अधिक गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान चिन्ह ,प्रमाणपत्र देऊन सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष धम्मराज साळवे यांनी मार्गदर्शन करताना व्यक्त केले कि रयत विद्यार्थी विचार मंच हि संकल्पना विद्यार्थ्यांच्या हितासाठी त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी तसेच त्यांना मदत व समस्या सोडवण्यासाठी कटिबद्ध आहे. आजचा विद्यार्थी उद्याचा देश घडवणारा घटक आहे त्यांचा सन्मान करून त्यांना देशाच्या प्रगतीच्या प्रवाहात घेणे हाच उद्देश आहे.

अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप – विद्यार्थी हा देशाचा पाय आहे. आर्थिक परिस्थिती मुळे कोणीही शिक्षणापासून वंचित राहूनयेत यासाठी महानगरपालिकेने अनेक योजना केल्या आहेत त्याचा लाभ विद्यर्थ्यांनी घेतला पाहिजे, उपलब्ध साधनांद्वारे आपण प्रयत्न केल्यास नक्कीच यश मिळवता येते. विद्यार्थ्यांनी चांगले मित्र निवडावे आणि व्यसनापासून दूर राहून प्रगती करावी.

पोलीस उप आयुक्त मा. मंचक इप्पर – प्रचंड इच्छा शक्ती असेल तर विद्यार्थी आपले करिअर घडवू शकतो, विद्यार्थ्यांनी आपले ध्येय उच्च ठेवून मार्ग क्रमण करून आपले ध्येय गाठले पाहिजे. विद्यार्थ्यांनी कंफर्ट झोन मधून बाहेर निघून जिद्दीने ध्येयाचा ध्येय वेडे होऊन पाठलाग करावा. वेळेचे योग्य नियोजन करून ज्ञानर्जन करावे.

जनसंपर्क अधिकारी किरण गायकवाड – यशस्वी होण्यासाठी प्रत्येकाला संधी मिळते आपण त्या संधीच सोन करणं आपल्या हाती असत, विद्यार्थ्यांनी गुन्हेगारी कडे व्यसनाकडे वळून आपले भविष्य अंधारात ढकलू नये, आपल्या कुटुंबाला, देशाला अभिमान वाटेल असे कार्य विद्यार्थ्यांनी करायला हवे, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले व रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे कार्याचे कौतुक करून शुभेच्छा व्यक्त केल्या.

मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली शाल, पुष्प आणि सन्मान चिन्ह देऊन मान्यवरांचे सन्मान करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रस्तावना महासचिव संतोष शिंदे, सूत्रसंचालन प्राजक्ता गायकवाड, आभार प्रगती कोपरे, संस्थेची भूमिका अभिजित साळुंखे, विक्रांत शेळके यांनी मांडली. यावेळी रयत विद्यार्थी विचार मंच पदाधिकारी सदस्य मयूर जगताप, अभिजित साळुंखे, समाधान गायकवाड, अभिजित लगाडे, प्रीतम वाघमारे, अतुल वाघमारे, विक्रांत शेळके, योगेश कांबळे, रोहित कांबळे, नीरज भालेराव, महेश गायकवाड, गाझी शेख, राहुल थोरात, करणं शिंदे, प्रमोद लोंढे, आकाश गुंजाळ, किरण ओपले, अजय यादव, सागर गायकवाड, भाग्यश्री आखाडे, प्रगती कोपरे, माधवी खरात, प्राजक्ता गायकवाड, प्रतिभा बनसोडे, त्याचबरोबर सामाजिक क्षेत्रातील मान्यवर अकील मुजावर, गुलाम मोहंमद शेख, फैयाज शेख, राम भंडारी, विनोद गायकवाड, रवी कांबळे, नितीन ओव्हाळ, चंद्रकांत बोचकुरे, नितीन गवळी, विकास गायकांबळे, प्रसाद गायकवाड, यासिन मणेरे इतर मान्यवर सदस्य उपस्थित होते.

लोकमत



रयत विद्यार्थी मंचतर्फे पिंपरी येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी महापालिकेचे उपायुक्त उल्हास जगताप, पोलीस उपायुक्त मंचक इप्पर, जनसंपर्क अधिकारी किरण गायकवाड, धम्मराज साळवे आणि मान्यवर.

# दहावी, बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा पिंपरीत गौरव

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**पिंपरी :** रयत विद्यार्थी विचारमंच संस्थेतर्फे रविवारी पिंपरी येथे दहावी व बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन करण्यात आले.

महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप, पोलीस उपायुक्त मंचक इप्पर, जनसंपर्क अधिकारी किरण गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. रयत विद्यार्थी विचार मंचचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे, मयूर जगताप, अभिजित साळुंखे, समाधान गायकवाड, अभिजित लगाडे, प्रीतम वाघमारे, अतुल वाघमारे, विक्रांत शेळके, योगेश कांबळे, रोहित कांबळे, नीरज भालेराव, महेश गायकवाड, गाझी शेख, राहुल थोरात, करण शिंदे, प्रमोद लोंढे, आकाश गुंजाळ, किरण ओपले, अजय यादव, सागर गायकवाड, भाग्यश्री आखाडे, प्रगती कोपरे, माधवी खरात, प्राजक्ता गायकवाड, प्रतिभा बनसोडे, अकील मुजावर, गुलाम मोहंमद शेख, फैयाज शेख, राम भंडारी, विनोद गायकवाड, रवी कांबळे, नितीन ओव्हाळ, चंद्रकांत बोचकुरे, नितीन गवळी, विकास गायकांबळे, प्रसाद गायकवाड, यासिन मणेरे उपस्थित होते.

संस्थेचे महासचिव संतोष शिंदे यांनी प्रास्ताविक केले. प्राजक्ता गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. प्रगती कोपरे यांनी आभार मानले. अभिजित साळुंखे, विक्रांत शेळके यांनी संयोजन केले.

> विद्यार्थी हा देशाचा पाया आहे. आर्थिक परिस्थितीमुळे कोणीही शिक्षणापासून वंचित राहू नयेत यासाठी महापालिकेकडून काही योजना राबविण्यात येत आहेत. त्याचा लाभ विद्यार्थ्यांनी घेतला पाहिजे.
>
> **- उल्हास जगताप, अतिरिक्त आयुक्त, महापालिका**

> प्रचंड इच्छाशक्ती असेल तर विद्यार्थी आपले करिअर घडवू शकतो. विद्यार्थ्यांनी आपले ध्येय उच्च ठेवून मार्गक्रमण करावे. विद्यार्थ्यांनी 'कम्फर्ट झोन'मधून बाहेर निघून जिद्दीने ध्येयाचा पाठलाग करावा.
>
> **- मंचक इप्पर, पोलीस उपायुक्त**

Hello Pimpri Chinchwad
Page No. 2 Aug 09, 2022
Powered by: erelego.com



दिनांक : ०८ ऑगस्ट २०२२

मावळ तालुक्यातील कोथूर्णे गावातील दुसरीत शिकणाऱ्या स्वरांजली चांदेकर या ०७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर झालेल्या अन्याय अत्याचार प्रकरणाची केस फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून पीडितेला तात्काळ न्याय मिळावा याकरिता विशेष सरकारी वकील उज्वल निकम यांची सदर प्रकरणात नियुक्ती करावी या मागणीकरिता रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या मावळ तालुका टीमच्या वतीने मा.तहसीलदार तहसीलदार मधुसूदन बर्गे साहेब यांच्या मार्फत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले. यावेळी मावळ तालुका प्रमुख अतुल वाघमारे,महासचिव विक्रांत शेळके,मावळ तालुका उपाध्यक्ष सागर गायकवाड,मावळ तालुका कार्याध्यक्ष पूजा गायकवाड,मावळ तालुका सहसचिव धनश्री पवार,मावळ तालुका सदस्य अजय यादव उपस्थित होते..



## कोथुर्णे प्रकरण जलदगती न्यायालयात चालवा

**पिंपरी :** कोथुर्णेतील अत्याचार प्रकरण जलदगती न्यायालयात चालवावा, या प्रकरणासाठी विशेष सरकारी वकील ॲड. उज्वल निकम यांची नियुक्ती करावी, अशी मागणी मावळ तालुका कार्यकारिणी रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने मुख्यमंत्र्यांना करण्यात आली आहे. तहसीलदार मधुसूदन बर्गे यांना याबाबत निवेदन दिले. यावेळी मावळ तालुका प्रमुख अतुल वाघमारे, महासचिव विक्रांत शेळके, उपाध्यक्ष सागर गायकवाड, कार्याध्यक्ष पूजा गायकवाड, सहसचिव धनश्री पवार, सदस्य अजय यादव उपस्थित होते.

दिनांक १० ऑगस्ट २०२२

लोकमत

# आठवड्याला शैक्षणिक जनसंवाद सभा घ्या

लोकमत न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** शहरात महापालिकेच्या शाळा, अनुदानित, विनाअनुदानित तसेच खासगी शाळा, अनधिकृत शाळा मोठ्या प्रमाणात आहेत. शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.

शैक्षणिक तक्रारीचे निवारण करण्यासाठी प्रत्येक आठवड्यात शैक्षणिक जनसंवाद सभा आयोजित करण्याबाबत रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्यावतीने अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे यांना निवेदन दिले. यावेळी संस्थापक-अध्यक्ष धम्मराज साळवे, प्रदेश महासचिव संतोष शिंदे, शहर संघटक अभिजित लगाडे उपस्थित होते.

दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, अनेक शैक्षणिक प्रश्न असताना शिक्षण विभागात मात्र शिक्षण अधिकारी अनेक वेळा उपलब्ध होत नाहीत. शिक्षण अधिकारी कोणतीही ठोस भूमिका घेत नाहीत. शाळांविरोधात तक्रार आल्यावर तक्रारीकडे दुर्लक्ष केले जाते अथवा फक्त एक नोटीस देण्यापलीकडे कोणतीही कारवाई केली जात नाही. पर्यवेक्षक आपल्या सवडीनुसार तक्रारी सोडवण्याचा प्रयत्न करतात व एक प्रकारे शाळेला मदत करण्याचा प्रयत्न करतात, असेही दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

Hello Pimpri Chinchwad
Page No. 12 Aug 14, 2022
Powered by: erelego.com

दिनांक १४ ऑगस्ट २०२२










## दिनांक १५ ऑगस्ट २०२२

## तृतीयपंथी बांधवांच्या हस्ते ध्वजारोहण

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने पिंपरी गांधीनगर येथील संपर्क कार्यालयासमोर देशाचा ७५ वा अमृत मोहोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे ध्वजारोहण करण्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून तृतीयपंथी घटकातील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये सुरक्षारक्षक म्हणून काम पाहणाऱ्या मा.सिद्धी कुंभार या उपस्थित होत्या.तृतीयपंथी सिद्धी कुंभार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.यावेळी सिद्धी कुंभार यांनी असे मत व्यक्त केले की आज खूप अभिमानाचा क्षण आहे की एका तृतीयपंथी व्यक्तीच्या हस्ते ध्वजारोहण करण्याचा रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने मान मिळाला. यावेळी प्रमुख उपस्थिती तृतीयपंथी सिद्धी कुंभार व त्यांचे सहकारी यांचा भारतीय संविधान देऊन सन्मान करण्यात आला ...

# स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव जल्लोषात

'हर घर तिरंगा'ने शहर तिरंगामय

पिंपरी : पुढारी वृत्तसेवा

**पिंपरी-चिंचवड शहरात स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षानिमित्त 'हर घर तिरंगा' अभियान राबवून घरोघरी देशभक्ती जागृत झाली. शहर देशभक्तीपर गीतांनी, रॅली, घोषणा आणि प्रभात फेरी यांनी दुमदुमून गेले. शहरातील विविध संस्थांच्या व शाळांच्या रॅली आणि प्रभात फेऱ्यांनी नागरिकांच्या मनात देशप्रेमाची भावना निर्माण केली. अनेक जणांनी 'हर घर तिरंगा' या अभियानास प्रतिसाद देत तिरंग्यासह सेल्फीचा आनंद घेतला.**

## महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या पिंपरी कार्यालयात माजी महापौर योगेश बहल यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले. याप्रसंगी नगरसेविका सुलोचना धर, अण्णा जोगदंड, मानवी हक्क संरक्षण आणि जाग्रतीच्या शहर अध्यक्षा संजना करंजवणे, माजी केंद्र संचालक सुरेश पवार, केंद्र उपसंचालिका सुरेखा मोरे, संगिता क्षीरसागर उपस्थित होते.

## आम आदमी पार्टी

आम आदमी पार्टी पिंपरी-चिंचवड शहराच्या संपर्क कार्यालयामध्ये ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते ध्वजारोहण करून मानवंदना देण्यात आली. याप्रसंगी कार्यकारी अध्यक्ष चेतन बेंद्रे, खंडोबा देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त विठ्ठल काळभोर, माजी सैनिक वाल्मीक बेंद्रे, माजी सैनिक दस्तगीर मुल्ला, अण्णासाहेब कुराडे, भगवान बडगुजर उपस्थित होते. त्याचप्रमाणे साईनगर येथील आप कार्यालयात झेंडावंदन करण्यात आले. या प्रसंगी यशवंत कांबळे, संतोषी नायर उपस्थित होते.

## लोक जागर ग्रुप

लोक जागर ग्रुपच्या वतीने डॉ. सुरेश बेरी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी राम नलावडे, गोकुळ बंगाल, सुधीर मुरुमकर, स्वप्नील जेवळे, एकनाथ पाठक, मेघना बेरी आदी उपस्थित होते. यावेळी सचिन देसाई व प्रकाश हगवणे यांनी विचार मांडले. रामदिन यादव व निशांत चौधरी यांनी देशभक्तीपर गीते गायली.

## दत्त साई प्रतिष्ठान

पिंपरी-चिंचवड-चिखली प्राधिकरण येथे दत्त साई प्रतिष्ठानच्या वतीने झेंडावंदन करण्यात आले होते. या वेळी अध्यक्ष दत्तात्रय जगताप, गणेश ठोंबरे, ज्योती गोफणे, अंजना नेरलेकर, किशोर टमाटे उपस्थित होते.



## रयत विद्यार्थी मंच

रयत विद्यार्थी मंच संस्थेने तृतीय पंथीय बांधवांच्या हस्ते ध्वजारोहण केले. आज रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेकडून आम्हाला झेंडावंदन करण्याचा मान मिळाला हा सन्मान आमच्यासाठी प्रेरणादायी आहे, असे मत तृतीयपंथी ग्रीन मार्शल पीसीएमसी व रामा तृतीय पंथी दक्षता सामाजिक संस्थेच्या सचिव सिद्धी कुंभार यांनी व्यक्त केले. याप्रसंगी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थापक धम्मराज साळवे, महासचिव संतोष शिंदे, शहराध्यक्ष मयूर जगताप, सचिव प्रगती कोपरे, भाग्यश्री आखाडे तसेच रामा तृतीय पंथी दक्षता सामाजिक संस्था अध्यक्ष रामा भोरकडे, निलेश पवार उपस्थित होते.

## हुतात्म्यांचे स्मरण करणे आपले कर्तव्य : आ. लांडगे

**पिंपरी :** देशाच्या स्वातंत्र्यासाठी अनेकांनी बलिदान दिले. त्यामुळेच आपण इंग्रजांच्या जोखडातून मुक्त झालो. अशा शूरवीरांचे, स्वातंत्र्यसैनिकांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्य आहे, अशा भावना भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केल्या. पिंपरी-चिंचवड भाजपातर्फे सोमवारी (दि. १५) स्वातंत्र्य दिनी मोरवाडी येथील जनसंपर्क कार्यालयात ध्वज वंदन करण्यात आले. त्या प्रसंगी आमदार उमा खापरे, नवनगर प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, प्रदेश चिटणीस अमित गोरखे, माजी महापौर राहुल जाधव, माजी स्थायी समिती सभापती नितीन लांडगे, संघटन सरचिटणीस अमोल थोरात यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

## शहर युवक काँग्रेस

पिंपरी चिंचवड शहर युवक काँग्रेसच्या वतीने काळेवाडी येथे आशा राजगुरू या महिला सफाई कर्मचाऱ्याच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी रक्तदान शिबिर आणि आरोग्य तपासणी करण्यात आली. रामकली चव्हाण, शोभा शिरसाट यांना शहर युवक काँग्रेसचे अध्यक्ष कौस्तुभ नवले, शहर काँग्रेसचे सरचिटणीस सज्जी वर्की यांच्या हस्ते सन्मानित केले. याप्रसंगी उपाध्यक्ष चंद्रशेखर जाधव, करणसिंग गिल, विशाल कसबे, अक्षय शहरकर, प्रतीक जगताप उपस्थित होते.

---

पुण्यनगरी

# शहरात अमृतमहोत्सवी स्वातंत्र्य दिन उत्साहात

## प्रशासकीय भवनात ध्वजारोहण : शहरात स्वातंत्र्य दिनानिमित्त विविध उपक्रम




**पिंपरी : अमृत महोत्सवी स्वातंत्र्य दिन शासकीय, निमशासकीय कार्यालये, आस्थापना, शाळा, महाविद्यालये, तसेच विविध संस्था, संघटनांकडून मोठ्या उत्साहात सोमवारी (दि.१५) साजरा करण्यात आला. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीच्या प्रांगणात आयुक्त तथा प्रशासक राजेश पाटील यांच्या हस्ते भारतीय राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण पार पडले. तसेच, हर घर तिरंगा मोहिमेला चांगला प्रतिसाद मिळाला.**

महापालिकेच्या कार्यक्रमात महापालिकेच्या सुरक्षा दल, अग्निशामक दल, तसेच तृतीयपंथी ग्रीन मार्शल, रिव्हर मार्शल आणि सुरक्षा दलाच्या वतीने सलामी देण्यात आली. अग्निशामक दलाच्या वतीने पाण्याच्या तुषारांद्वारे भारतीय तिरंग्याची प्रतिकृती सादर करून उपस्थितांची मने जिंकली. महापालिकेच्या औद्योगिक प्रशिक्षण केंद्राच्या, तसेच विविध शैक्षणिक संस्थांच्या विद्यार्थ्यांनी 'भारत माता की जय, वंदे मातरम' असा नारा देत महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीच्या प्रांगणात प्रभातफेरी काढली. पालिकेत झालेल्या रक्तदान शिबिरास २०० जणांनी रक्तदान केले.

राष्ट्रध्वजारोहण कार्यक्रमास विधानपरिषदेच्या आमदार उमा खापरे, अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे, जितेंद्र वाघ, उल्हास जगताप, सहआयुक्त आशादेवी दुरगुडे, माजी आमदार ज्ञानेश्वर लांडगे, मुख्य लेखापरिक्षक राजेंद्र भोसले, मुख्य लेखा व वित्त अधिकारी जितेंद्र कोळंबे, उपआयुक्त रविकिरण घोडके, चंद्रकांत इंदलकर, संदिप खोत, विठ्ठल जोशी, अजय चारठाणकर, सचिन ढोले, मनोज लोणकर, यशवंतराव चव्हाण रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, वैद्यकीय उपअधिक्षक डॉ. उज्वला आंदूरकर, डॉ. मनिषा सूर्यवंशी, मुख्य माहिती तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण, मुख्य अग्निशमन अधिकारी किरण गावडे, मुख्य सुरक्षा अधिकारी मेजर उदय जरांडे, सहशहर अभियंता संजय कुलकर्णी, सहाय्यक आयुक्त अण्णा बोदडे, वामन नेमाणे, बाळासाहेब खांडेकर, सुषमा शिंदे, निलेश देशमुख, श्रीनिवास दांगट, कार्यकारी अभियंता ज्ञानदेव जुंधारे, प्रमोद ओंभासे, बाळासाहेब गलबले, महिला वैद्यकीय अधिकारी डॉ. वर्षा डांगे, डॉ. वर्षा घोगरे, जनता संपर्क अधिकारी किरण गायकवाड, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, पशु वैद्यकीय अधिकारी डॉ. अरुण दगडे, माजी महापौर अपर्णा डोके, माजी उपमहापौर राजू मिसाळ, माजी नगरसेवक नामदेव ढाके, अमित गावडे, गोविंद पानसरे, बबन झिंजुर्डे, अंबर चिंचवडे आदी उपस्थित होते.

### भक्ती शक्तीजवळ देशभक्तिपर गीतांचा कार्यक्रम

दरम्यान, निगडी भक्ती शक्ती उद्यान या ठिकाणी देशभक्तीपर गीतांचा कार्यक्रम पार पडला.निगडी प्राधिकरण येथील मदनलाल धिंग्रा मैदानावर शालेय विद्यार्थ्यांनी मानवी साखळीच्या माध्यमातून राष्ट्रध्वजासह विविध प्रतिकृतींचे सादरीकरण केले. यामध्ये ज्ञानप्रबोधिनी शाळा तसेच महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थी सहभागी झाले होते.

### संत तुकाराम महाराज संतपीठात ध्वजारोहण

चिखलीतील संत तुकाराम महाराज संतपीठामध्ये ध्वजारोहण केले. प्राचार्या डॉ. मृदुला महाजन, पालिकेचे निवृत्त क्रीडा अधिकारी राजु कोतवाल, वायसीएम रुग्णालयातील डॉ. जयश्री कोतवाल, आंतरराष्ट्रीय खेळाडू ऐश्वर्या साठे, संचालक हभप राजु महाराज ढोरे आदी उपस्थित होते. राजु कोतवाल यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. यावेळी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला. प्रास्तविक शिक्षीका रचना बडवे यांनी केले. सखाराम पितळे यांनी आभार मानले.

### महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने स्वातंत्र्याचा राष्ट्रीय सण साजरा केला. माजी महापौर योगेश बहल यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी गुणवंत कामगार अण्णा जोगदंड,माजी नगरसेविका सुलोचना धर शिलवंत, शिवाजी शिर्के, मानवी हक्क संरक्षण संस्थेच्या शहराध्यक्षा संजना करंजवणे, माजी केंद्र संचालक सुरेश पवार, केंद्र उपसंचालीका सुरेखा मोरे, संगिता क्षीरसागर, हभप यादव तळोले, हभप शामराव गायकवाड, शंकर नानेकर, गुणवंत कामगार गोरखनाथ वाघमारे,किरण कोळेकर, रविंद्र राणावत, तृप्ती राणावत, शैलेजा आवडे आदी उपस्थित होते.

### तृतीयपंथी बांधवांकडून ध्वजारोहण

अमृत मोहत्सवानिमित्त तृतीयपंथी बांधवांकडून ध्वजारोहण करत रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेने माणूसकीचा संदेश देत उत्साहात स्वातंत्र्यदिन साजरा केला. यावेळी रामा तृतीय पंथी दक्षता सामाजिक संस्थेचे सचिव सिद्धी कुंभार, उपाध्यक्ष रितिका परमार, सदस्य रिद्धी जाधव, रयत विद्यार्थी विचार मंच अध्यक्ष धम्मराज साळवे, महासचिव संतोष शिंदे, शहराध्यक्ष मयूर जगताप, प्रगती कोपरे, भाग्यश्री एखादे, योगेश कांबळे आदी उपस्थित होते. राष्ट्रगीत, तसेच भारतीय संविधान प्रास्ताविक वाचन करण्यात आले.

### शरदचंद्र पवार महाविद्यालय

डुडुळगाव येथील श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळाचे शरदचंद्र पवार महाविद्यालयात ७५ वा स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी संस्थेचे प्रशासकीय संचालक आर. पी. पाटील यांच्या हस्ते ध्वजपूजन, तर माजी सरपंच विठ्ठल तळेकर व उद्योजक ज्ञानेश्वर वरुटे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.यावेळी हभप तुषार महाराज खताळे, संस्थेचे खजिनदार मयुर ढमाले, प्रा. सर्जेराव बरकडे, डॉ. सुरेंद्र पवार, प्राचार्य डॉ. हंसराज थोरात, फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. प्रमोद इंगळे, मुख्याध्यापिक शितल पाटील, अतुल पानसरे,प्रा. प्रविण डोळस आदी उपस्थित होते.



### न्यू सिटी प्राइड स्कूलमध्ये ध्वजारोहण

रहाटणी क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले एज्युकेशन फाउंडेशन संचालित न्यू सिटी प्राईड इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

प्रभात फेरीनतंर कॅप्टन साहिल बलोत्रा यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संस्थेचे संस्थापक अरुण चाबुकस्वार, सेक्रेटरी वसंत चाबुकस्वार, संदीप चाबुकस्वार, रणजित बागल, माजी पोलिस निरीक्षक सुरेश भालेराव, आर. डी. भालेराव, अँड. सिमा शर्मा, संजय सोनार, महेंद्र परमार, अंजुम सय्यद, युवराज प्रगने, अमोल घोलप, संतोष कापसे, शशी जाधव, राजेश भालेराव आदी उपस्थित होते. या निमित्त चित्रकला स्पर्धा व निबंध स्पर्धेचे बक्षिस वितरण, तसेच विद्यार्थ्यांचा देश भक्तिपर गीते व नृत्याचा कार्यक्रम पार पडला. सूत्रसंचालन सुनंदा साळवी यांनी केले. आभार रेणू वर्मा यांनी केले.




Smart Pimpri-Chinchwad
Page No 1 August 17, 2022





## दिनांक १९ ऑगस्ट २०२२
## आयुक्त राजेश पाटील यांची समारोपीय भेट

मा.राजेश पाटील यांची पिंपरी चिंचवड शहर अध्यक्ष पदावरून बदली झाल्यावर शहराच्या विकासासाठी केलेल्या लोककल्याणाच्या कार्याचे कौतुक करण्यासाठी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर व प्रदेश महासचिव संतोष शिंदे यांनी समारोपीय भेट घेतली.यावेळी त्यांना लोकराजे शिवराय हे पुस्तक भेट देण्यात आले व त्यांना त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या....











दिनांक २६ ऑगस्ट २०२२

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे प्रदेश महासचिव संतोष शिंदे यांच्या वाढदिवसानिम्मित सामाजिक उपक्रम म्हणून रयत विद्यार्थी विचार मंच पिंपरी चिंचवड शहर कार्यकारणी अध्यक्ष मयूर जगताप व त्यांच्या टीम ने सावली निवारा केंद्र पिंपरी येथे गरजू लोकांना फळे व बिस्कीट वाटप केले.यावेळी संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर,प्रदेश महासचिव संतोष शिंदे,सहसचिव भाग्यश्री आखाडे,पिंपरी चिंचवड शहर प्रमुख मयूर जगताप,सचिव प्रगती कोपरे,सदस्य गाझी शेख उपस्थित होते...



Reg. No. : MH-25-0006899

रिपब्लिकन आवाज

बातम्या ! विश्लेषण ! बरच काही

संपादक : अमोल एल. डंबाळे

web : www.republicanaawaj.com Email : republicanaavaj@gmail.com 9028 633 644 Digital

# रयत विद्यार्थी विचार मंच पिंपरी चिंचवड शहर कार्यकारणीच्या वतीने संस्थेचे प्रदेश महासचिव संतोष शिंदे यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाद्वारे साजरा

**रिपब्लिकन आवाज न्युज**

पिंपरी : प्रतिनिधी

संतोष शिंदे हे शैक्षणिक क्षेत्रात विद्यार्थी मित्रांचे शैक्षणिक प्रश्न सोडवण्यासाठी,विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करण्यासाठी,विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्नशील असतात..

अश्या या विद्यार्थी नेतृत्वाचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून व्हावा याकरीता रयत विद्यार्थी विचार मंच पिंपरी चिंचवड शहर कार्यकारणीच्या वतीने पिंपरी येथील सावली किनारा केंद्रातील निराधार बांधवांसोबत वाढदिवस करण्यात आला.यावेळी सावली किनारा केंद्रातील निराधार बांधवाना पदाधिकारी यांच्या वतीने फळे व बिस्कीट वाटप करण्यात आले.तसेच त्यांच्याशी संवाद साधला..

यावेळी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर,प्रदेश महासचिव संतोष शिंदे,सहसचिव भाग्यश्री आखाडे,पिंपरी चिंचवड शहर अध्यक्ष मयूर जगताप,शहर सचिव प्रगती कोपरे,सदस्य गाझी शेख उपस्थित होते.

यानिमित्त उपस्थित संस्थेचे प्रदेश महासचिव संतोष शिंदे यांनी असे मत व्यक्त केले की, आजच्या तरुणांनी वाढदिवसावर वायफळ खर्च करण्यापेक्षा लोकपयोगी सामाजिक उपक्रम राबवले पाहीजे.तसेच सावली निवारा केंद्र हे निराधार लोकांना आधार देऊन समाजसेवेच्या माध्यमातून माणुसकीचे दर्शन घडवत आहे.सावली निवारा केंद्राला नेहमी रयत विद्यार्थी विचार मंचाचे सहकार्य राहील.







दिनांक २२ ऑगस्ट २०२२

भोसरी येथील २ गरजु विद्यार्थींना रयत विद्यार्थी विचार मंच कडून शूज देण्यात आले ...






पिंपरी चिंचवड महानगरपालिका
औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मोरवाडी
PCMC ITI MORWADI


पिंपरी चिंचवड महानगरपालिका
औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मोरवाडी
PCMC ITI MORWADI









## दिनांक १६ सप्टेंबर २०२२

## रोजगार मेळावा

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,मनपा आयटीआय मोरवाडी व रयत विद्यार्थी विचार मंच यांच्या वतीने ITI मोरवाडी येथे रोजगार मेळावा घेण्यात आला.रोजगार मेळाव्यात जवळपास १५ कंपन्या सहभागी होत्या.रोजगार मेळाव्यात ३४० पेक्षा अधिक उमेदवारांनी सहभाग नोंदवला..मा. अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप साहेब ,सहाय्यक आयुक्त म्हेमाणे ,विशेष अधिकारी किरण गायकवाड साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक अवताडे साहेब ,ITI प्राचार्य शशांक पाटील सर ,विविध कंपनीचे HR उपस्थित होते, आयटीआय मोरवाडी व रयत विद्यार्थी विचार मंच पदाधिकारी संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे,प्रदेश महासचिव संतोष शिंदे,पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष मयूर जगताप,शहर समनव्यक प्रमोद लोंढे,सहसचिव भाग्यश्री आखाडे,शहर सचिव प्रगती कोपरे,सदस्य माधवी खरात,सदस्य अविनाश इनकर,सदस्य अक्षय गायकवाड नियोजनात सहभाग घेतला.



रोजगार मेळाव्यात उमेदवारांच्या मुलाखती घेताना प्रतिनिधी.

# महापालिकेच्या रोजगार मेळाव्यात साडेतीनशे युवकांचा सहभाग

**पिंपरी : पुढारी वृत्तसेवा**

शहरातील विद्यार्थ्यांना रोजगार मिळावा, यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने मोरवाडी येथील औद्योगिक प्रशिक्षण केंद्रामध्ये (आयटीआय) शुक्रवारी (दि.१६) रोजगार मेळावा घेण्यात आला. शहरातील सुमारे ३६० युवकांनी सहभाग नोंदवला.

मेळाव्यात जेबीएम, बीव्हीजी, टाटा स्त्रीव्ह, महिंद्रा यांसारख्या वीसहून अधिक नामांकित कंपन्या या सहभागी झाल्या होत्या. या वेळी सहाय्यक आयुक्त वामन नेमाणे, प्राचार्य शशिकांत पाटील, संदीपान झोंबाडे, भाऊसाहेब आडागळे, रोहिणी रासकर, राज साळवे, संतोष शिंदे, मयूर जगताप, प्रमोद लोंढे, भाग्यश्री आखाडे आदी उपस्थित होते.

वरिष्ठ पोलिस निरीक्षक आवताडे म्हणाले की, सध्या गुन्हेगारीकडे वळलेले तरुण बेरोजगार असून, त्यांना समुपदेशन करून योग्य मार्गाकडे घेऊन जाण्याची सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. व्यवसाय व रोजगाराची संधी उपलब्ध करून दिल्यास समाजात सकारात्मक बदल घडेल. मनोज ढेरंगे यांनी स्वागत केले. ज्योत सोनवणे यांनी सूत्रसंचालन केले. किरण गायकवाड यांनी आभार मानले.

दिनांक १७ सप्टेंबर २०२२













**दिनांक १७ सप्टेंबर २०२२**

**रयत विद्यार्थी विचार मंच आयोजित आरोग्य मार्गदर्शन**

थेरगाव येथील मराठवाडा मित्रमंडळाचे माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थिनींना आरोग्य विषयक मार्गदर्शन कार्यक्रम रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने घेण्यात आला आरोग्य तज्ञ संदीप कुयटे यांनी विद्यार्थीनाना आहार आणि आरोग्य ,शरीरातील बदल योग्य मार्गदर्शन केले.संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे यांनी अभ्यास कसा करावा या संदर्भात मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे नियोजन महासचिव संतोष शिंदे ,समन्वयक माधवी खरात व शिक्षक वृंद यांनी केले..

## एम. एम. विद्यालयात मुलींना आरोग्यविषयक मार्गदर्शन

**पिंपरी, दि. १८ (प्रतिनिधी) -** किशोरवयीन मुलींसाठी रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने मुलींसाठीमार्गदर्शनपर व्याख्यान घेण्यात आले. त्यामध्ये मुलींच्या वेगवेगळ्या शारीरिक समस्यांवर समुपदेशन करण्यात आले. मुलींनी उपस्थित केलेल्या सर्व प्रश्नांची सविस्तर उत्तरे देण्यात आली.

आरोग्य विषयक जनजागृती कार्यक्रम काळेवाडीतील मराठवाडा मित्रमंडळ माध्यमिक विद्यालय येथे घेण्यात आला. यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय विभागाचे आरोग्यतज्ज्ञ संदीप कामठे हे प्रमुख मार्गदर्शक होते. त्यांनी उपस्थित किशोरवयीन मुलींना आरोग्यविषयक समस्या, वैयक्तिक स्वच्छता, शारीरिक बदल व मासिक पाळी विषयी समस्या आदी विषयांवर मार्गदर्शन केले. मुलींच्या शंका व समस्या जाणून घेऊन त्याचे निरसन केले.

या वेळी शाळेतील शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. रयत विद्यार्थी विचार मंचचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे, प्रदेश महासचिव संतोष शिंदे, माधवी खरात व शाळेतचे शिक्षक उपस्थित होते.

लोकमत

## काळेवाडीमध्ये किशोरवयीन मुलींना केले मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने मराठवाडा मित्रमंडळ माध्यमिक विद्यालय, काळेवाडी येथे आरोग्यविषयक जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. मुलींचे मानसिक व शारीरिक आरोग्य हे निरोगी व सशक्त असायला हवे म्हणून किशोरवयीन मुलींना यावेळी आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यात आले.

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे, प्रदेश महासचिव संतोष शिंदे, सदस्य



माधवी खरात, एस. एल. शिंदे, ए. पी. शिंदे, एस. यु. शिंदे उपस्थित होते.यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचे आरोग्यतज्ज्ञ संदीप कामठे यांनी मुलींना मार्गदर्शन केले. धम्मराज साळवे यांनीही मनोगत व्यक्त केले.

Hello Pimpri Chinchwad
Page No. 8 Sep 18, 2022
Powered by: erelego.com

लोकमत

# पालिकेत प्रशासनाने कर्मवीरांची जयंती साजरी करावी

लोकमत न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** कर्मवीर भाऊराव पाटील हे मराठी समाजसुधारक आणि शिक्षणप्रसारक होते. त्यांचा भारतीय स्वातंत्र्यलढ्यातही सहभाग होता. त्यांनी विद्यार्थ्यांना बंधुभाव व सामाजिक समता याचा संदेश दिला. भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेल्या रयत शिक्षण संस्थेत साडेचार लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. पिंपरी-चिंचवड शहरातही रयत शिक्षण संस्थेच्या शाळा व महाविद्यालये आहेत. या थोर व्यक्तिमत्वाची दि.२२ सप्टेंबर रोजी जयंती आहे. यानिमित्त महापालिकेच्या वतीने महापालिका भवनात कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात यावे, अशी मागणी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेतर्फे केली आहे.

Hello Pimpri Chinchwad
Page No. 4 Sep 21, 2022
Powered by: erelego.com

# कर्मवीर भाऊराव पाटील यांचा महापुरुषांच्या यादीत समावेश करा



**पिंपरी, दि. २० (प्रतिनिधी)** - कर्मवीर भाऊराव पाटील हे मराठी समाजसुधारक आणि शिक्षणप्रसारक होते. सर्वसामान्य जनतेपर्यंत शिक्षणप्रसार करण्यासाठी त्यांनी रयत शिक्षण संस्था स्थापली. भाऊरावांनी मागास व गरीब मुलांना शिक्षण घेणे शक्य व्हावे म्हणून कमवा व शिका ही योजना सुरू करून मोठे काम केले. अशा या थोर व्यक्तिमत्वाची दि. २२ सप्टेंबर २०२२ रोजी जयंती आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा शासकीय महापुरुषांच्या यादीत समावेश करून त्यांची जयंती शासकीय व महानगरपालिका स्तरावर साजरी होण्यासाठी पिंपरी-चिंचवड पालिकेच्या वतीने कार्यवाही करावी, अशी मागणी रयत विद्यार्थी मंचाच्या वतीने करण्यात आली आहे.

याबाबत प्रसिध्दीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, कर्मवीर भाऊराव पाटील हे जोतीराव फुले यांनी सुरु केलेल्या सत्यशोधक समाजाचे एक महत्त्वाचे सदस्य होते. त्यांचा भारतीय स्वातंत्र्यलढ्यातही सहभाग होता. रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून त्यांनी शिक्षणाचा प्रसार केला. रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून त्यांनी चालवलेल्या वसतिगृहमध्ये विविध जाती-धर्माचे विद्यार्थी एकत्र राहत असत. यामधून पाटील यांनी विद्यार्थ्यांना बंधुभाव व सामाजिक समता याचा संदेश दिला.

## दिनांक २१ सप्टेंबर २०२२

कर्मवीर भाऊराव पाटील यांचा समावेश शासकीय महापुरूषांच्या यादीत करून त्यांची जयंती पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने साजरी करण्यात यावी.





## दिनांक २२ सप्टेंबर २०२२
## कर्मवीर भाऊराव पाटील जयंती

रयत शिक्षण संस्थेचे पिंपरी येथील महात्मा फुले महाविद्यालयात कर्मवीर भाऊराव पाटील यांना जयंतीनिमित्त रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने अभिवादन करण्यात आले.तसेच महात्मा फुले महाविद्यालयाचे नवनिर्वाचित प्राचार्य मा.जगदाळे सर यांना भारतीय संविधानाची प्रास्तविका देऊन त्यांचे स्वागत केले.

यावेळी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर,प्रदेश महासचिव संतोष शिंदे,प्रदेश सहसचिव भाग्यश्री आखाडे,पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष मयूर जगताप,शहर उपाध्यक्ष समाधान गायकवाड, शहर सचिव प्रगती कोपरे,सदस्य अक्षय गायकवाड उपस्थित होते...

# रयत विद्यार्थी विचार मंचतर्फे कर्मवीर भाऊराव पाटील यांना अभिवादन

**पिंपरी, दि. २२ (प्रतिनिधी)** - समाजसुधारक आणि शिक्षणप्रसारक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त रयत विद्यार्थी विचार मंचाच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

यावेळी संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे, प्रदेश महासचिव संतोष शिंदे, प्रदेश सहसचिव भाग्यश्री आखाडे, शहराध्यक्ष मयूर जगताप, उपाध्यक्ष समाधान गायकवाड, प्रगती कोपरे, प्रमोद लोंढे, अक्षय गायकवाड उपस्थित होते.




दिनांक २२ सप्टेंबर २०२२

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयटीआय ( मोरवाडी ) चे प्राचार्य मा.शशांक पाटील सर यांची रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या पदाधिकारी यांनी सदिच्छा भेट घेतली व त्यांना भारतीय संविधान प्रस्ताविका भेट देण्यात आली.

प्राचार्य मा.शशांक पाटील सर हे आयटीआयच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षण आणि त्याबरोबर विद्यार्थ्यांना रोजगार मिळावा याकरिता सातत्याने रोजगार मेळावे आयोजित करत असतात.त्यांच्या या उपक्रमाचे रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने कौतुक केले.. यावेळी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर,प्रदेश महासचिव संतोष शिंदे,प्रदेश सहसचिव भाग्यश्री आखाडे,पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष मयूर जगताप,शहर उपाध्यक्ष समाधान गायकवाड, शहर सचिव प्रगती कोपरे,सदस्य अक्षय गायकवाड उपस्थित होते.








Date: 23/9/2022

प्रति,
मा. संस्थापक / अध्यक्ष
रयत विद्यार्थी विचार मंच

विषय :- आपल्या संस्थेकडून शैक्षणिक कारणासाठी आर्थिक मदत मिळणेबाबत

अर्जदार :- शशिकला संतोष थोरात
पत्ता :- हनुमान हौ. सोसायटी, रुपीनगर, निगडी.
मो. नंबर :- 9834402004

महोदय,
वरील विषयानुसार विनंती करते की माझी आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असून माझे पती यांचे 2 महिन्यांपूर्वी निधन झाले असून माझ्यावर माझ्या 3 मुलींची जबाबदारी आहे. माझी मुलगी जानवी संतोष थोरात ही सेंट पिटर्स इंग्लिश स्कूल (रुपीनगर, निगडी) वर्ग चौथी, या शाळेत शिक्षण घेत होती. परंतु 16300/- रुपये फिस अभावी शाळेने शाळा सोडल्याच्या दाखल्यावर फिस पेंडिंग चा शेरा मारला आहे. यामुळे माझ्या मुलीला इतर कोणत्याही शाळेत ॲडमिशन मिळत नाही आहे. तरी कृपया आपल्या रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने माझ्या मुलीकरिता आर्थिक मदत मिळावी ही आपणास नम्र विनंती...

आपली विश्वासू
शशिकला
शशिकला संतोष थोरात

## दिनांक २२ सप्टेंबर २०२२

## गरजू विद्यार्थीनीला शिक्षणासाठी आर्थिक_मदत

## _विद्यार्थीनीचे_शैक्षणिक नुकसान_टळले.

निगडी येथे राहणार्या शशिकला थोरात यांचे पती २ महिन्यांपूर्वी वारले.त्यांच्यावर ३ मुलींची जबाबदारी.त्यांची परिस्थिती अत्यंत हालाखीची आहे.त्यांच्या जानवी थोरात व मानसी थोरात या दोन मुली सेंट पिटर्स इंग्लिश स्कुल निगडी या शाळेत शिक्षण घेत होत्या. दोघींची मिळून १६३०० रुपये फिस पेंडिंग होती. फिसअभावी शाळेने जानवी थोरात या मुलीच्या शाळा सोडल्याचा दाखल्यावर #फिस_पेंडीगचा शेरा मारला होता.फिस पेंडिंग चा शेरा मारल्यामुळे इतर शाळा ॲडमिशन देण्यास नकार देत होत्या.शशिकला थोरात या ४ महिन्यापासून आर्थिक मदत मिळावी व आपल्या मुलीचे शैक्षणिक होणारे नुकसान टाळावे यासाठी प्रयत्न करत होत्या पण त्यांना मदत मिळाली नाही.त्यांना रयत विद्यार्थी विचार मंच ची माहिती मिळाल्यावर त्यांनी माझ्याशी संपर्क केला.रयत विद्यार्थी विचार मंचच्या सर्व पदाधिकारी यांनी पैसे जमा केले.इतरांनी देखील मदत केली व शाळा व्यवस्थापनाशी चर्चा व विनंती करून ३ हजार रुपये निधीचा चेक देऊन जानवी थोरात या विद्यार्थ्यांनीच्या शाळा सोडलेल्या दाखल्यावरील फी पेंडिंगचा शेरा काढून टाकला..

जानवी थोरात या विद्यार्थीनीला शैक्षणिक व आर्थिक सहाय्य केल्याबद्दल तिच्या पालकांच्या वतीने संस्थेचे आभार व्यक्त करण्यात आले.



Camlin Page
Date 23 / 9 / 2022

प्रति,
मा. संस्थापक / अध्यक्ष
रयत विद्यार्थी विचार मंच

विषय :- आपल्या आर्थिक मदतीमुळे माझ्या मुलीचा शाळा सोडल्याचा दाखला मिळालाबाबत.

अर्जदार :- शशिकला संतोष थोरात
पत्ता :- हनुमान हौ. सोसायटी, रुपीनगर, निगडी.
मो. नंबर :- 9834502005.

महोदय,
माझी मुलगी जानवी संतोष थोरात ही सेंट पिटर्स इंग्लिश स्कुल (रुपीनगर, निगडी) वर्ग. चौथी, या शाळेत शिक्षण घेत होती. परंतु 16300/- रुपये फिस अभावी शाळेने शाळा सोडल्याच्या दाखल्यावर फिस पेंडिंग चा शेरा मारला आहे. यामुळे माझ्या मुलीला इतर कोणत्याही शाळेत ॲडमिशन मिळत नव्हते. परंतु आपल्या ~~संस्था~~ संस्थेच्या वतीने आर्थिक मदत मिळाल्यामुळे माझ्या मुलीचे होणारे शैक्षणिक नुकसान वाचले. आपल्या केलेल्या मदतीकरीता मी आपली खूप खूप आभारी आहे.

आपली विश्वासू
शशिकला
शशिकला संतोष थोरात

## दिनांक ०७ ऑक्टोबर २०२२
## नवनियुक्त आयुक्त तथा प्रशासक
## मा. शेखर सिंह यांची सदिच्छा भेट




पिंपरी चिंचवड महानगरपालिका नवनियुक्त आयुक्त तथा प्रशासक मा. शेखर सिंह यांची रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर यांनी सदिच्छा भेट घेत भारतीय संविधान प्रास्ताविक देऊन त्यांचा सन्मान करत व पुढील वाटचालीस शुभेच्छा देताना

PimpriChinchwad, 11 Oct 2022, Page:015

## पिंपरी-चिंचवडमध्ये बार्टीचे उपकेंद्र सुरू करा

**पिंपरी, दि. १० (प्रतिनिधी)** - पिंपरी-चिंचवडला ज्ञानाचे केंद्र बनविण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राचे (बार्टी) उपकेंद्र पिंपरी-चिंचवडमध्ये सुरू करण्यात यावे, अशी मागणी रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने करण्यात आली आहे.

यासंदर्भात रयतच्या वतीने बार्टीचे महासंचालकांना निवेदन दिले आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवडमध्ये अनुसूचित जाती जमातींची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. शहरातील अनुसूचित जाती जमातीच्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेसाठी पुणे शहरात यावे लागते. अनेकांना ते शक्य होत नाही. यामुळे बार्टी उपकेंद्रच्या माध्यमातून अनुसूचित जाती जमातीच्या मुला-मुलींसाठी केंद्रीय व राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षा तसेच इतर सर्व स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन केंद्र पिंपरी-चिंचवड येथे सुरू करावे. तसेच, सर्व महामानवांचे जीवन चारित्र्य, महिला सक्षमीकरण, समतावादी विचाराचे साहित्य वाचकांसाठी उपलब्ध होईल. त्यामुळे शहराची एक नवी ओळख आणि एक वेगळा ठसा निर्माण झाला असून आता शिक्षणाबरोबरच संशोधन, प्रशिक्षण व सामाजिक तत्त्व प्रणालीचा विकास होणे गरजेचे आहे.

Dainik Prabha

## 'शहरात 'बार्टी'चे उपकेंद्र सुरू करावे'

**पिंपरी** : पिंपरी- चिंचवड शहरात बार्टीचे उपकेंद्र सुरू करण्याची मागणी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने करण्यात आली आहे.

यासंदर्भात बार्टीचे महासंचालक यांना निवेदन देण्यात आले आहे. त्यात म्हटले आहे की, दि. २२ डिसेंबर १९७८ रोजी समता विचारपीठाची स्थापना करण्यात आली. ऑक्टोबर २००८ च्या शासन निणार्यानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणेला स्वायत्त संस्था म्हणून मान्यता देण्यात आली. या संस्थेचा उद्देश संशोधन व प्रशिक्षण आणि सामाजिक समता वृद्धिंगत करण्यासाठी शैक्षणिक उपक्रम, संमेलने, व्याख्याने, परिसंवाद आयोजित करणे सामाजिक समता या तत्त्वप्रणालीचा अभ्यास विविध ठिकाणी संस्थेचे उपकेंद्र सुरू करावे.

पिंपरी-चिंचवड शहरात अनुसूचित जाती जमातीची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात आहे. शहरातील अनुसूचित जाती जमातीच्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षासाठी पुणे शहरात जावे लागते. अनेकांना ते शक्य होत नाही. त्यामुळे बार्टी उपकेंद्रच्या माध्यमातून अनुसूचित जाती, जमातीच्या मुला-मुलींसाठी केंद्रीय व राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षा तसेच इतर सर्व स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन केंद्र पिंपरी चिंचवड येथे सुरू करावे. महामानवांचे जीवन चारित्र्य, महिला सक्षमीकरण, समतावादी विचाराचे साहित्य वाचकांसाठी उपलब्ध होईल. पिंपरी चिंचवड शहर हे ज्ञानाचे केंद्र बनण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे या संस्थचे उपकेंद्र येथे सुरू करावे, असे निवेदनात म्हटले आहे.

दिनांक ०७ ऑक्टोबर २०२२

पिंपरी चिंचवड शहरात बार्टीचे उपकेंद्र सुरु करावे याकरिता बार्टी महासंचालक यांच्याकडे मागणी

*कमी पटसंख्येच्या शाळा बंद करण्याचा निर्णय रद्द करून मराठी शाळांचे डिजिटलायजेशन करणेबाबत रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने मा.मुख्यमंत्री यांना निवेदन..*

https://maharashtra14news.com/ryat-vidyarthi-thoughts-on-digitalization-of-marathi-schools-by-revoking-the-decision-to-close-schools-with-low-enrollment/... See more



maharashtra14news.com

**कमी पटसंख्येच्या शाळा बंद करण्याचा निर्णय रद्द करून मराठी शाळांचे डिजिटलायजेशन करणेबाबत रयत**

दिनांक १३ ऑक्टोबर २०२२

कमी पटसंख्येच्या शाळा बंद करण्याचा निर्णय रद्द करावा याकरीता मुख्यमंत्री यांना निवेदन



महाईन्यूज

लढाई सत्याची...लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com

संस्थापक, संपादक : श्री. अधिकराव दिवे-पाटील

epaper.mahaenews.com
18 Oct 2022 - Page 1

# शिक्षणातील ‘नरकासुरां’चे मर्दन कधी?

## रयत विद्यार्थी मंचचा इशारा : दि. 19 ऑक्टोबरपासून उपोषण

।पिंपरी-चिंचवड ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शिक्षण विभागातील चुकीच्या प्रवृत्तींमुळे सर्वसामान्य विद्यार्थी-पालकांचे अतोनात नुकसान होत आहे. अशा अकार्यक्षम प्रवृत्तीविरोधात रयत विद्यार्थी मंचकडून विरोध करण्यात येत असून, शिक्षणातील नरकासुरांचे मर्दन करण्यासाठी आता उपोषणाचे अस्त्र उपसण्यात आले आहे.**

शैक्षणिक प्रश्नासंदर्भात रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्य गेटसमोर बुधवार दिनांक १९ ऑक्टोबर २०२२ रोजी एक दिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात येणार आहे, अशी माहिती प्रदेश महासचिव संतोष शिंदे यांनी दिली आहे. ऐन दिवाळीच्या पार्श्वभूमीवर शहरातील विद्यार्थ्यांसाठी सामाजिक संस्था संघटना उपोषण करावे लागते, ही बाब पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाचा ‘आंधळा’ कारभार चव्हाट्यावर मांडणारी आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात कसल्याही प्रकारची परवानगी न घेता अनधिकृत शाळा राजरोसपणे अनेक वर्षांपासून चालू आहेत. या शाळा विद्यार्थी व पालकांचे आर्थिक शोषण करतात.अनधिकृत शाळेत शिक्षण घेतल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे . या शाळांवर कारवाई व्हावी, यासाठी अनेकवेळा पत्रव्यवहार करून देखील केवळ नोटीस देण्यापलीकडे शिक्षण विभागाने कोणतीही ठोस भूमिका घेत नाही. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्क अधिनियम २००९ नुसार अनाधिकृत शाळांना १ लाख रुपये दंड मारण्याची तरतूद आहे व त्यानंतर देखील शाळा चालू ठेवल्यास प्रतिदिन १० हजार रुपये दंड ठोठवण्याचा अधिकार शिक्षण विभागाला आहे. तसेच,शिक्षण संचालकांवर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल व्हायला हवे होते परंतु अद्यापर्यंत शिक्षणविभागाने कोणतीच कारवाई केलेली नाही,अशी माहिती संतोष शिंदे यांनी दिली.

तसेच, अनुदानित, खाजगी शाळा मोठ्या प्रमाणात आहेत. शहरातील अनेक शाळा नियमबाह्य पद्धतीने काम करतात. विद्यार्थ्यांची आर्थिक लूट करणे, शाळा सोडल्याचे दाखले अडवणे, फी अभावी परीक्षेला बसू न देणे, आरटीईमधील विद्यार्थ्यांकडून पैसे घेणे, त्यांचे वेगळे वर्ग करणे, त्यांना हीन वागणूक देणे अश्या अनेक शैक्षणिक तक्रारी शिक्षण विभागास येत असतात. परंतु, तक्रार केल्यावर त्या तक्रारींचे निवारण होत नाही सामाजिक शैक्षणिक संस्था संघटनांच्या निवेदनाला शिक्षण विभागाकडून उत्तरे दिली जात नाहीत.

### प्रशासनाला गांभीर्य नाही ...

दरवर्षी शाळा चालू होतात आणि दरवर्षी सामाजिक शैक्षणिक संस्थांना महापालिकेच्या शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आंदोलन करावे लागते. शाळा चालू होऊन ३ ते ४ महिने उलटून सुद्धा विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य मिळत नाही. न्यायालयीन प्रकरण असल्याचे सांगून वेळ मारून नेली जाते.जर विद्यार्थ्यांना वेळेवर शैक्षणिक साहित्य मिळत नसेल तर मराठी शाळांची पटसंख्या कशी टिकून राहील ? महापालिकेतील विद्यार्थ्यांना हिवाळ्यात रेनकोट आणि पावसाळ्यात स्वेटर मिळतात असा हा अनागोंदी कारभार चालू आहे. या प्रश्नासंदर्भात कायमचा तोडगा काढला पाहिजे, अशी मागणी रयत विद्यार्थी मंचतर्फे करण्यात आली आहे.

### महापालिकेच्या 21 शाळा मुख्याध्यापकांविना...

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या २१ शाळा मुख्याध्यपकांविना सुरु आहेत. मुख्याध्यापक पदांसाठी शिक्षक पात्र असून देखील केवळ सेवा जेष्ठता यादीला उशीर झाल्याने त्यांना पदोन्नती मिळविलेली नाही. याचा थेट परिणाम कामकाजावर होताना दिसून येत आहे. कायमस्वरूपी मुख्याध्यापक नसल्याने शाळांचा कारभार इतर वरिष्ठ शिक्षकांच्या खांद्यावर आहे.परंतु क्षमता असूनही आवश्यक निर्णय घेता येत नसल्याने शाळांची गुणवत्ता कशी सुधारणार असा प्रश्न उपस्थित होत आहे.



# शिक्षण विभागाच्या विरोधात उद्या रयत विद्यार्थी विचार मंचाचे उपोषण

**पिंपरी, दि. १७ (प्रतिनिधी)** - पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शिक्षण विभागाच्या अकार्यक्षमतेविरोध रयत विद्यार्थी विचार मंचाच्या वतीने उद्या (बुधवार) महापालिकेच्या गेटवर एक दिवसीय उपोषण करण्यात येणार आहे.

शहरात कसल्याही प्रकारची परवानगी न घेता अनाधिकृत शाळा राजरोसपणे अनेक वर्षांपासून चालू आहेत. या शाळा विद्यार्थी व पालकांचे आर्थिक शोषण करतात. अनधिकृत शाळेत शिक्षण घेतल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे . या शाळांवर कारवाई व्हावी यासाठी अनेकवेळा पत्रव्यवहार करून देखील केवळ नोटीस देण्यापलीकडे शिक्षण विभागाने कोणतीही ठोस भूमिका घेत नाही. अनेक शाळा नियमबाह्य पद्धतीने काम करतात. विद्यार्थ्यांची आर्थिक लूट करणे, शाळा सोडल्याचे दाखले अडवणे, फी अभावी परीक्षेला बसू न देणे, अनेक शैक्षणिक तक्रारी शिक्षण विभागास येत असतात परंतु तक्रार केल्यावर त्या तक्रारींचे निवारण होत नाही. तसेच पालिकेच्या २१ शाळा मुख्याध्यपकांविना सुरु आहेत.

मुख्याध्यापक पदांसाठी शिक्षक पात्र असून देखील केवळ सेवा जेष्ठता यादीला उशीर झाल्याने त्यांना पदोन्नती मिळाली नाही. याचा थेट परिणाम कामकाजावर होताना दिसून येत आहे, अशा विविध प्रश्नांसंदर्भात आणि शिक्षण विभागाच्या अकार्यक्षमतेविरोधात उपोषण करण्यात येणार असल्याचा इशारा रयत विद्यार्थी विचार मंचाचे प्रदेश महासचिव संतोष शिंदे यांनी दिला आहे.

दिनांक १८ ऑक्टोबर २०२२

पिंपरी चिंचवड शहरातील अनाधिकृत शाळा तात्काळ बंद करण्यात याव्यात. शैक्षणिक तक्रारी तात्काळ सोडवण्यासाठी समिती नेमावी. महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना तात्काळ शालेय साहित्य गणवेश वाटप करण्यात यावेत.. महापालिकेच्या २१ शाळांना तात्काळ मुख्याध्यापक नियुक्त करावे. शैक्षणिक तक्रारी न सोडवणाऱ्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या विरोधात उपोषण करण्याबाबत इशारा,

## शालेय साहित्य वाटपावर आयुक्तांची मोहोर

**पिंपरी, ता. १७ :** शालेय साहित्य देण्यासाठी चार महिन्यांपासून आयुक्तांकडे प्रस्ताव पडून होता. अखेर महापालिका प्रशासनाने त्याची दखल घेतली असून ४१ हजार विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर शालेय साहित्याचे पैसे वर्ग करण्यात येणार आहेत. नुकताच याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

**डीबीटीचा निर्णय झाला आहे. पालकांच्या बँक खात्यात शालेय साहित्याचे पैसे देण्यात येणार आहेत. सुमारे १७ हजार पालकांचे बँकेत खाते नाही. त्यामुळे एखाद्या बँकेशी बोलून कॅम्पचे आयोजन करून खाते काढण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल.**

– **संजय नाईकडे,** प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग

महापालिकेच्या शाळांमध्ये तब्बल ४१ हजार २३० विद्यार्थी शिक्षण घेत आहे. त्यांना दरवर्षी दोन शालेय गणवेश, एक पीटी गणवेश, एक स्वेटर, एक रेनकोट दिला जातो. तसेच साहित्यामध्ये वह्या, पुस्तके, बूट, प्रयोगवही असे साहित्य दिले जाते. शाळा सुरू होऊन पाच महिने उलटल्यानंतर आता प्रशासनाने गणवेश वाटप सुरू केले आहे, तर शालेय साहित्याचे पैसे आधी मुख्याध्यापकांच्या खात्यावर, नंतर ते पालकांच्या खात्यावर पाठवण्यात येणार आहेत. सद्यःस्थितीत २३ हजार ५३० पालकांचे बँकेत खाते आहे. तर १७ हजार ७०० पालकांची नाहीत. पाच महिने होवूनही गणवेश न मिळाल्याने प्रशासनावर पालकांनी नाराजी व्यक्त केली होती. ठेकेदारांकडून गणवेश आल्यानंतर प्रशासनाकडून टाळाटाळ केली जात होती. अखेर प्रशासनाने गणवेश वाटपास सुरुवात केली आहे.




## दिनांक १८ ऑक्टोबर २०२२
## विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य मिळणार

शाळा चालू होऊन ४ महिने उलटून गेले तरी अद्याप पिंपरी चिंचवड महानगपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, गणवेश व इतर साहित्य वाटप करण्यात करण्यात आले नव्हते. या मुद्द्यासाठी शहरातील अनेक शिक्षणप्रेमी सहकाऱ्यांनी व रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने याविरोधात आवाज उठवला. १४ऑक्टोंबर रोजी शैक्षणिक साहित्याच्या संदर्भात व अन्य मुद्द्यासंदर्भात उपोषणाचा इशारा दिला असता उपोषणाच्या अगोदरच ४ महिने धूळ खात पडलेल्या प्रस्तावावर अखेर लक्ष देऊन अखेर हा प्रश्न मार्गी लावला.









**दिनांक १९ ऑक्टोबर २०२२**

**लाक्षणिक उपोषण**




• पिंपरी चिंचवड शहरातील अनाधिकृत शाळा तात्काळ बंद करण्यात याव्यात.
• शैक्षणिक तक्रारी तात्काळ सोडवण्यासाठी समिती नेमावी.
• महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना तात्काळ शालेय साहित्य गणवेश वाटप करण्यात यावेत.
• महापालिकेच्या २१ शाळांना तात्काळ मुख्याध्यापक नियुक्त करावे.

वरील मागण्या घेऊन रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने प्रदेश महासचिव संतोष शिंदे व पिंपरी चिंचवड अध्यक्ष मयूर जगताप यांच्या वतीने लाक्षणिक उपोषण करण्यात आले.










## दिनांक १९ ऑक्टोबर २०२२ लाक्षणिक_उपोषण_स्थगित

शिक्षणाधिकारी संजय नाईकडे यांच्या विनंतीनुसार उपोषण तात्पुरते स्थगित...

• पिंपरी चिंचवड शहरातील अनाधिकृत शाळा तात्काळ बंद करण्यात याव्यात.• शैक्षणिक तक्रारी तात्काळ सोडवण्यासाठी समिती नेमावी.

• महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना तात्काळ शालेय साहित्य गणवेश वाटप करण्यात यावेत.• महापालिकेच्या २१ शाळांना तात्काळ मुख्याध्यापक नियुक्त करावे.वरील मागण्या घेऊन रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने प्रदेश महासचिव संतोष शिंदे व पिंपरी चिंचवड अध्यक्ष मयूर जगताप यांच्या वतीने लाक्षणिक उपोषण करण्यात आले होते.महापालिकेचे शिक्षण अधिकारी मा.संजय नाईकडे यांच्या वतीने या उपोषणाची तात्काळ दखल घेत त्यांनी उपोषण स्थळी येऊन भेट घेतली.त्यांना सर्व तक्रारी समजून सांगितल्या.लवकरात लवकर चौकशी समिती नेऊन आपल्या मागण्यांवर कारवाई केली जाईल असे आश्वासन शिक्षण अधिकारी यांनी दिले व पाणी पाजून उपोषण सोडवण्यात आले.

# पिंपरी पालिका शिक्षण विभागाच्या गैरकारभाराविरोधात लाक्षणिक उपोषण

लोकसत्ता प्रतिनिधी



**पिंपरी :** पिंपरी पालिकेच्या शिक्षण विभागातील गैरकारभाराच्या विरोधात रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेने बुधवारी (१९ ऑक्टोबर) पालिका मुख्यालयासमोरच लाक्षणिक उपोषण केले. शिक्षणाधिकाऱ्यांनी आश्वासन दिल्यानंतर उपोषण मागे घेण्यात आले.

शिक्षण विभागाच्या चुकीच्या कारभाराविषयी वारंवार तक्रारी करूनही दखल घेतली जात नसल्याने संस्थेच्या वतीने बुधवारी आंदोलन करून विविध मुद्द्यांकडे लक्ष वेधण्यात आले. पिंपरी-चिंचवड शहरात अनुदानित, खासगी शाळा मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. नियमबाह्य पद्धतीने काम करणाऱ्या या शाळांकडून पालकांची, विद्यार्थ्यांची आर्थिक लूट केली जाते. पालिकेची कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता काही अनधिकृत शाळा राजरोसपणे अनेक वर्षांपासून सुरू आहेत. संबंधित शिक्षण संचालकांवर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करावेत. शाळा सुरू होऊन ३ ते ४ महिने उलटून गेल्यानंतरही पालिका शाळांमधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य मिळत नाही. हिवाळ्यात रेनकोट आणि पावसाळ्यात स्वेटर मिळतात, असा अनागोंदी कारभार सर्रास होतो. मराठी शाळांची पटसंख्या दिवसेंदिवस कमी होत आहे याकडे आंदोलकांनी लक्ष वेधले. पालिकेचे शिक्षण अधिकारी संजय नाईकडे यांनी सर्व तक्रारींची चौकशी समिती नेमून त्या सोडवण्यात येतील, असे आश्वासन त्यांनी दिले. रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे अध्यक्ष धम्मराज साळवे, मानव कांबळे, संतोष शिंदे यांच्यासह भाग्यश्री आखाडे, अतुल वाघमारे, योगेश कांबळे, गाझी शेख, करण शिंदे आदींनी आंदोलनात सहभाग घेतला.







लोकसत्ता Thu, 20 October 2022
https://epaper.loksatta.com/c/70601350


दिनांक २० ऑक्टोबर २०२२

लोकमत

# तक्रार अर्जावर कारवाई होत नसल्याने आंदोलन

लोकमत न्यूज नेटवर्क

**पिंपरी** : पिंपरी-चिंचवड शहरात कसल्याही प्रकारची परवानगी न घेता अनधिकृत शाळा राजरोसपणे अनेक वर्षांपासून चालू आहेत. या शाळा विद्यार्थी व पालकांचे आर्थिक शोषण करतात. तसेच वारंवार तक्रारी करून देखील दिलेल्या तक्रारी अर्जावर कारवाई होत नसल्याने बुधवारी (दि. १९) रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने लाक्षणिक उपोषण करण्यात आले.

यावेळी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे, प्रदेश सहसचिव भाग्यश्री आखाडे, मावळ तालुका प्रमुख अतुल वाघमारे, पिंपरी चिंचवड शहर कार्याध्यक्ष योगेश कांबळे, सदस्य गाझी शेख, सदस्य करण शिंदे, सदस्य श्रीयश कदम तसेच ज्येष्ठ नेते मानव कांबळे, बाबा कांबळे, गौरव जाधव, शिवशंकर उबाळे, भैयासाहेब गजधने, प्रकाश बुक्तर, अरु लोंढे, शंकर शिंदे आदी उपस्थित होते.

शैक्षणिक तक्रारी संदर्भात पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आउट गेट समोर चालू असलेल्या उपोषण स्थळी येऊन शिक्षण अधिकारी संजय नाईकडे यांनी उपोषणकर्त्यांची भेट घेतली. व सर्व तक्रारी जाणून घेऊन या सर्व तक्रारींची चौकशी समिती नेमून या तक्रारी सोडवण्यात येतील, असे आश्वासन दिले.

Hello Pimpri Chinchwad
Page No. 8 Oct 21, 2022
Powered by: erelego.com

**दिनांक २१ ऑक्टोबर २०२२**

सकाळ

# शिक्षण विभागाकडून भरतीसाठी हालचाली ?

पिंपरी, ता. २८ : महापालिकेच्या प्राथमिक शाळेत शिक्षकांची संख्या कमी असल्यामुळे शिक्षण विभागाकडून नवीन २८५ जागांसाठी भरती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. सहायक आणि शिक्षक या दोन पदांसाठी ही भरती केली जाणार आहे. ही भरती प्रक्रिया लवकरच राबविण्यात येणार असून येत्या काही दिवसांतच याची जाहिरात प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

शहरात महापालिकेच्या १०५ प्राथमिक शाळा आहेत. त्यातील २१ शाळा सध्या मुख्याध्यापकाविना सुरू आहेत. तर, शिक्षकांचीही कमतरता आहे. मुख्याध्यापकांच्या २१ जागांवर पात्रता धारण करणाऱ्या शिक्षकांना लवकरच पदोन्नती देण्यात येणार आहे. मुख्याध्यापक आणि पर्यवेक्षक या दोन्ही पदांवर शैक्षणिक अर्हता व सेवा कालमर्यादिनुसार पात्र शिक्षकांना पदोन्नती दिल्यानंतर शिक्षकांची संख्या आणखी कमी होणार आहे. तर, काही सेवानिवृत्त होणार आहेत. त्यातच रिक्त होणाऱ्या जागा भरण्यासाठी प्राथमिक विभागाकडून कंत्राट पद्धतीने भरती प्रक्रिया राबविली जाणार आहे. एकूण २८५ शिक्षकांची भरती करण्यात येणार आहे. त्यातील काही पदे सहायक आणि काही पदवीधर म्हणून भरली जाणार आहेत. त्यामुळे स्वतंत्र शिक्षक उपलब्ध होणार आहे.

**सध्या सेवाज्येष्ठता यादी तयार करण्याचे काम हाती आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर पात्र शिक्षकांना पदोन्नती दिली जाणार आहे. या तांत्रिक बाबी पूर्ण करण्याच्या प्रक्रियेला गती देण्यात आली आहे. लवकरच पात्र शिक्षकांना मुख्याध्यापक व पर्यवेक्षक पदावर पदोन्नती देण्यात येणार आहे. तसेच, निवृत्त शिक्षकांच्या जागा विचारात घेऊन एकूण शिक्षकांच्या रिक्त जागा भरण्यासाठी ही भरती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.**
**- संदीप खोत**, उपायुक्त, प्राथमिक शिक्षण विभाग

ही भरती प्रक्रिया लवकरच राबविण्यात येणार असून येत्या काही दिवसांतच याची जाहिरात प्रसिद्ध करण्यात येणार आहे. सहायक पदासाठी डीएड ही अर्हता असणार आहे. तर, पदवीधर पदासाठी बीएड ही पदोन्नती दिली जाणार शैक्षणिक अर्हता निर्धारित राहणार आहे. मेरिट तपासून भरती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. मेरिटमधल्या उमेदवारांचीच निवड केली जाणार आहे. या शिक्षकांचा कंत्राट कालावधी सहा महिन्याचा राहणार आहे. त्यांना प्रतिमहा २० हजार रुपये मानधन दिले जाणार आहे, अशी माहिती महापालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभागाचे उपायुक्त संदीप खोत यांनी दिली.

Pune, PCMC-Today
29/10/2022 Page No. 1

## दिनांक ०२ नोव्हेंबर २०२२

## २१ महापालिकेच्या शाळेमध्ये मुख्याध्यापक नियुक्त  होणार

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या गैरकारभारा विरोधात रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने आम्ही लाक्षणिक उपोषण केले होते.शिक्षण अधिकारी यांनी तुमच्या मागण्या तातडीने मान्य करू असे आश्वासन दिले होते.त्यामधील २१ महापालिकेच्या शाळेमध्ये मुख्याध्यापक नियुक्त करणे यावर  पालिकेने अपेक्षित कारवाई सुरू केली आहे.







## दिनांक २६ नोव्हेंबर २०२२
## संविधान दिन

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकात भारतीय संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन करण्यात आले.तसेच समता सैनिक दलाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा यांचे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धेमध्ये प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाची प्रस्ताविका भेट देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.





## दिनांक २६ नोव्हेंबर २०२२
## संविधान दिन

संविधान दिनानिमित्त रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने पिंपरी चिंचवड महानगपालिकेचे प्रभारी आयुक्त प्रदीप जांभळे पाटील व अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप साहेब यांना भारतीय संविधान प्रास्ताविका भेट देण्यात आली...












## दिनांक २६ नोव्हेंबर २०२२
## संविधान संवाद अभियान

पिंपरी चिंचवड महापालिका आयोजित बानाई,रयत विद्यार्थी विचार मंच व संविधान संवादक चळवळ यांच्या सहकार्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या संत तुकाराम नगर दीन दयाळ उपाध्याय शाळेत विद्यार्थ्यांना संविधनाबबाबत मार्गदर्शन केले..





## दिनांक २६ नोव्हेंबर २०२२

पिंपरी चिंचवड महापालिका आयोजित बानाई,रयत विद्यार्थी विचार मंच व संविधान संवादक चळवळ यांच्या सहकार्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या खरळवाडी पिंपरी येथील प्राथमिक व माध्यमिक बालभवन शाळेत विद्यार्थ्यांना संविधनाबबाबत मार्गदर्शन केले..


पिंपरी चिंचवड महानगरपालिका
संविधान संवाद अभियान २०२२
भारतीय संविधानाचा आधार
संविधान संवादक







## दिनांक २६ नोव्हेंबर २०२२
## संविधान संवाद अभियान उद्घाटन

पिंपरी चिंचवड महापालिका आयोजित बानाई,रयत विद्यार्थी विचार मंच व संविधान संवादक चळवळ यांच्या सहकार्याने संपूर्ण पिंपरी चिंचवड शहरात आजपासून सलग ५ दिवस शहरात संविधानाचा प्रचार प्रसार करण्यासाठी संविधान संवाद अभियान राबविण्यात येत आहे.या अभियानाचे उद्घाटन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे प्रभारी आयुक्त प्रदीप जांभळे पाटील,अतिरिक्त आयुक्त ३ उल्हास जगताप साहेब व अन्य अधिकारी व आजी माजी नगरसेवक यांच्या उपस्थितीत पार पडले यावेळी बानाई,रयत विद्यार्थी विचार मंच,संविधान संवादक चळवळ यांचे सर्व प्रतिनिधी उपस्थित होते..

# संविधान रोजच्या जगण्याचा भाग झाला पाहिजे - जांभळे पाटील

**पिंपरी, दि. २७ (प्रतिनिधी) - भारतीय संविधान हे फक्त न्यायालयापुरतेच सीमित न ठेवता या संविधानाची जनजागृती मोठ्या प्रमाणात होणे गरजेचे असून हे संविधान सर्वांच्या रोजच्या जगण्याचा भाग झाले तर नक्कीच भविष्यात सकारात्मक बदल घडेल, असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त प्रदिप जांभळे पाटील यांनी केले.**

संविधान दिवसाचे औचित्य साधून संविधानाची शहरातील नागरिकांना ओळख व्हावी, यासाठी महापालिकेच्या वतीने २६ आणि २७ नोव्हेंबर रोजी पिंपरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याशेजारील मैदानात विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. पिंपरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याशेजारील मैदानात महापालिकेच्या वतीने आयोजित केलेल्या प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे उद्घाटन अतिरिक्त आयुक्त प्रदिप जांभळे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप, उपआयुक्त रविकिरण घोडके, विशेष अधिकारी किरण गायकवाड, माजी नगरसेवक बाबा त्रिभुवन, मारुती भापकर, माजी नगरसेविका अनुराधा गोरखे, रयत विचार मंचाचे धम्मराज साळवे, संतोष शिंदे, संतोष जोगदंड, सामाजिक कार्यकर्ते मनोज तोरडमल, अण्णासाहेब कुडळे तसेच विविध संघटनांचे प्रतिनिधी यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**विद्यार्थ्यांचा सत्कार**

या कार्यक्रमात स्पर्धा परीक्षेत यश संपादन केलेल्या यशस्वी विद्यार्थ्यांचा महापालिकेच्या वतीने सत्कार करण्यात आला. महापालिकेच्या थेरगाव माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी ई-बाईक बनवली. त्या विद्यार्थ्यांचा सत्कार यावेळी करण्यात आला. महापालिकेच्या थेरगाव येथील प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी संविधानावर आधारित पोवाडा सादर केला. महापालिका आयोजित आणि बानाई व रयत विद्यार्थी विचार मंच यांच्या सहकार्याने शहरातील सर्व प्रभागात संविधान संवादक अभियान उपक्रमाद्वारे संविधान रथ तसेच पथनाट्याच्या माध्यमातून भारतीय संविधानाबद्दल जनजागृती करण्यात येणार आहे. या अभियानाची औपचारिक सुरुवात यावेळी करण्यात आली. आज सकाळी साडेदहा वाजता महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अतिरिक्त आयुक्त प्रदिप जांभळे पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. तदनंतर, पिंपरी येथील भारतरतव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन करण्यात आले.

**अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर महाचर्चा**

सप्तखंजिरीवादक पवन दवंडे यांच्या लोकप्रबोधनात्मक किर्तनाच्या कार्यक्रमाने या प्रबोधनात्मक पर्वाची सुरुवात झाली. दुपारी २ वाजता कविसंमेलन पार पडले. आणि तरीही आम्ही बोलू नये.. यावर आधारित कविसंमेलनामध्ये अनेक दिग्गज कवींनी सहभाग घेतला होता. दुपारी साडेचार वाजता माध्यमातील अभिव्यक्ती स्वातंत्र्यासमोरील आव्हाने या विषयावर महाचर्चा झाली. यामध्ये चित्रपट दिग्दर्शक, अभिनेते महेश कोठारे, अभिनेते संदीप पाठक आणि अभिनेते राजकुमार तांगडे सहभागी झाले होते. चर्चासत्राचे सूत्रसंचालन वृत्तवाहिनी निवेदक प्रसन्न जोशी यांनी केले. त्यानंतर अश्वघोष आर्ट अँण्ड कल्चरल फाऊंडेशन संचलित कबीर नाईकनवरे यांचा गीत, संगीत आणि निवेदनातून भारतीय संविधानाची जनजागृती करणारा प्रबोधनात्मक गीतांच्या महाजलसेचा सलाम संविधान हा कार्यक्रम संपन्न झाला. सायंकाळी पिंपळे गुरव येथील नटसम्राट निळू फुले नाट्यगृहामध्ये धीरज वानखेडे, मंजुषा शिंदे आणि संकल्प गोळे यांचा गीत गायनाचा कार्यक्रम पार पडला.

## दिनांक २७ नोव्हेंबर २०२२





**दिनांक २७ नोव्हेंबर २०२२**

**चर्च मध्ये संविधान संवाद अभियान**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयोजित रयत विद्यार्थी विचार मंच,बा,संविधान संवादक चळवळ यांच्या माध्यमातून दापोडी येथील चर्च मध्ये संविधान प्रस्ताविका त्यातील प्रत्येक शब्दाचा अर्थ समजावून सांगण्यात आला.तरुणांच्या मनातील संविधानाबाबत असलेले गैरसमज आक्षेप याबद्दल खूप छान चर्चा झाली.











## दिनांक २८ नोव्हेंबर २०२२

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयोजित रयत विद्यार्थी विचार मंच, बानाई,संविधान संवादक चळवळ यांच्या माध्यमातून आज दुसऱ्या दिवशी पिंपरी चिंचवड शहरात खालील ठिकाणी संविधान संवाद अभियान राबवण्यात आले. १) कासारवाडी,छत्रपती शिवाजी महाराज पुतळा २) कासारवाडी, मुख्य चौक ३) हिराबाई झोपडपट्टी,कासारवाडी ४) तानाजी मालुसरे पुतळा – दापोडी ५) बुद्ध विहार - पिंपळे गुरव ६) डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा- दापोडी ७) जुनी सांगवी चौक साई चौक- सांगवी ८) निळू फुले नाट्यगृह ९) महाबोधी विहार- दापोडी १०) विनियार्ड चर्च – दापोडी ११) जिजाऊ गार्डन - पिंपळे गुरव १२) पिंपळे निलख

पुढारी



लोकवस्तीमध्ये संविधान संवाद अभियान राबविताना कलाकारांचे पथक.

# गप्पागोष्टी, गीतांद्वारे चालता बोलता संविधानाचा जागर

**पिंपरी : पुढारी वृत्तसेवा**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने शहरात संविधान संवाद अभियान उपक्रम राबविण्यात येत आहे. पथनाट्य, गीत सादरीकरणातून लोकवस्ती तसेच, शाळा, महाविद्यालय, प्रार्थनास्थळ अशा विविध ठिकाणी विद्यार्थी व नागरिकांसोबत संवाद साधून संविधानाचे महत्त्व पटवून देण्यात येत आहे.

पालिकेच्या वतीने बानाई, रयत विद्यार्थी विचार मंच, लोकराजा शाहू संविधान संवाद प्रशिक्षण केंद्र यांच्या सहकार्याने हे अभियान बुधवार (दि.३०) पर्यंत संपूर्ण शहरात राबविण्यात येत आहे. संविधानाला अपेक्षित नागरिक घडवण्यासाठी संविधान मूल्यांचा प्रचार व प्रसार करण्यात येत आहे.

शनिवारी (दि.२६) संत तुकारामनगर, गांधी नगर, फुले नगर, विठ्ठल नगर, बालाजी नगर या परिसरात अभियान राबविण्यात आले. रविवारी (दि. २७) कासारवाडी, दापोडी, सांगवी, पिंपळे गुरव, पिंपळे निलख आणि सोमवारी (दि.२८) भोसरी, मोशी, चिखली, आकुर्डी, निगडी सेक्टर क्रमांक २२, तळवडे, रुपीनगर या भागात संविधानाचे महत्त्व पटवून देणारा हा उपक्रम राबविण्यात आला.

My Pimpri Edition
Nov 29, 2022 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

पथनाट्यातून जनजागृती...



पिंपरी : पथनाट्याद्वारे पिंपरी-चिंचवड शहरात संविधानाची जनजागृती करताना बानाई, रयत विद्यार्थी विचार मंच आणि संविधान संवादक चळवळचे तरूण.

# पथनाट्यातून तरुणांची संविधान जनजागृती

पिंपरी, दि. २९ (प्रतिनिधी) - तरूणांनी पुढाकार घेत पिंपरी-चिंचवड शहरात संविधान संवाद अभियान उपक्रम राबविला. बानाई, रयत विद्यार्थी विचार मंच आणि संविधान संवादक चळवळ यांच्या पुढाकाराने याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तरूणांनी पथनाटय, गीत सादरीकरणातून संविधानाचे महत्त्व पटवून दिले. शाळा, महाविद्यालय, मंदिर, मस्जिद आदी विविध ठिकाणी विद्यार्थी नागरिकांसोबत संवाद साधून संविधानाचे महत्व पटवून देण्यात येत आहे. २६ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत शासनाच्या सूचनांनुसार हा कार्यक्रम सुरू राहणार आहे.

## बानाई, रयत विद्यार्थी विचार मंच आणि संविधान संवादकतर्फे आयोजन

संत तुकारामनगर, गांधीनगर, फुलेनगर, विठ्ठलनगर, बालाजीनगर या परिसरात, २७ नोव्हेंबर रोजी उपक्रम आयोजित करण्यात आला. २८ नोव्हेंबर रोजी कासारवाडी, दापोडी, सांगवी, पिंपळे गुरव, पिंपळे निलख येथे तर भोसरी, मोशी, चिखली, आकुर्डी, निगडी सेक्टर २२, तळवडे, रुपीनगर या भागात संविधानाचे महत्व पटवून देणारे उपक्रम राबविण्यात आले.

दिनांक ३० नोव्हेंबर २०२२

# राष्ट्र बळकटीसाठी संविधानाचा जागर महत्वपूर्ण – प्रा. सुभाष वारे

**पिंपरी, दि. १ (प्रतिनिधी)** - संविधान संवाद अभियानाद्वारे भारतीय संविधानाची जनजागृती करणे हा अतिशय आगळावेगळा उपक्रम ठरला असून संविधान समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचवण्यासाठी असे अभियान महत्त्वपूर्ण ठरत आहे. राष्ट्र बळकट करण्यासाठी संविधानाचा हा जागर महत्वपूर्ण ठरला असून संविधानाच्या जनजागृतीसाठी सर्वांनी निरंतर सामुहिक प्रयत्न करीत राहणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन प्रा. सुभाष वारे यांनी केले.



**संत तुकारामनगर : महापालिकेने आचार्य अत्रे रंगमंदिरात आयोजित केलेल्या कार्यक्रमास उपस्थित मान्यवर.**

महापालिकेच्या वतीने २६ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत शहरात 'संविधान संवाद अभियान' उपक्रम राबविण्यात आला होता. दि. ३० नोव्हेंबर रोजी पिंपरी येथील आचार्य अत्रे रंगमंदिरात या अभियानाचा समारोप झाला. अभियानात सहभाग घेऊन प्रचार प्रसाराचे कार्य करणाऱ्या विविध संस्था आणि व्यक्तींचा अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला. त्यावेळी प्रा. वारे बोलत होते. सामाजिक कार्यकर्ते मानव कांबळे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, विजय कांबळे, चंद्रकांत पाटील, धम्मराज साळवे, संतोष शिंदे, भाग्यश्री आखाडे, लोकराजा शाहू संवाद प्रशिक्षण केंद्राचे सुनील स्वामी, राज वैभव, शोभा रामचंद्र, रेश्मा खाडे आदी उपस्थित होते. शहरातील आठही प्रभागांमधील विविध शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यात आला. लोककला, पीपीटी, गाणी, गप्पा, गोष्टी आणि चालता बोलता संविधान अशा अनेक माध्यमातून प्रास्ताविकेत नमूद केलेल्या सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य या शब्दांचा अर्थ समजावून सांगून नागरिकांशी संवाद साधला.

बानाई विद्यार्थी विचार मंच आणि संविधान संवादक चळवळ यांच्या सहकार्याने उपक्रम राबविण्यात आला होता. पथनाट्य, गीत सादरीकरण तसेच धार्मिक स्थळे येथे संवाद साधून संविधानाचे महत्व पटवून दिले. सूत्रसंचालन विजय कांबळे यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी संतोष शिंदे यांनी आभार मानले.

# 'संविधानाची प्रामाणिकपणे अंमलबजावणी होणे गरजेचे'

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पिंपरीः** संविधानाची प्रामाणिक अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. त्यातूनच समाज सुधारक व महापुरुषांना अपेक्षित असलेले राष्ट्र निर्माण होईल, असा विश्वास प्रा. सुभाष वारे यांनी पिंपरीत व्यक्त केला. सर्वांना समान हक्क, अधिकार प्राप्त होऊन विकासाची संधी मिळावी, यासाठी हे संविधान स्वतः समजून घेऊन ते इतरांना समजावून सांगितले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

पिंपरी पालिकेच्या वतीने आयोजित केलेल्या ''संविधान संवाद अभियान'' उपक्रमाच्या समारोपप्रसंगी वारे बोलत होते. अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप, सामाजिक कार्यकर्ते मानव कांबळे, पालिकेचे विशेष अधिकारी किरण गायकवाड, बानाईचे विजय कांबळे, चंद्रकांत पाटील, रयत विद्यार्थी विचार मंचचे धम्मराज साळवे, संतोष शिंदे, भाग्यश्री आखाडे, लोकराजा शाहू संवाद प्रशिक्षण केंद्राचे सुनील स्वामी आदी उपस्थित होते.

वारे म्हणाले, की संविधान संवाद अभियानाद्वारे भारतीय संविधानाची जनजागृती करणे हा अतिशय आगळावेगळा उपक्रम आहे. हा उपक्रम निरंतर राबवण्यात यावा.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय कांबळे यांनी केले. संतोष शिंदे यांनी आभार मानले.

epaper.loksatta.com
लोकसत्ता Fri, 02 December 2022
https://epaper.loksatta.com/c

**पुढारी**



महापालिकेच्या संविधानाच्या जनजागृती अभियानात सहभागी स्वयंसेवकांचा सन्मान करताना अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप. समवेत प्रा. सुभाष वारे, मानव कांबळे, किरण गायकवाड आदी.

# संविधान जनजागृतीसाठी निरंतर सामूहिक प्रयत्न गरजेचे

**संविधान अभियान सांगता कार्यक्रमात सुभाष वारे यांचे प्रतिपादन**

**पिंपरी : पुढारी वृत्तसेवा**

राष्ट्र बळकट करण्यासाठी संविधानाचा जागर महत्वपूर्ण आहे. संविधानाच्या जनजागृतीसाठी सर्वांनी निरंतर सामुहिक प्रयत्न करीत राहणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन प्रा. सुभाष वारे यांनी केले.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्यावतीने पाच दिवस शहरात संविधान संवाद अभियान उपक्रम राबविण्यात आला. या उप्रकमाचा समारोप बुधवारी पिंपरी येथील आचार्य अत्रे रंगमंदिरात झाला. अभियानात सहभाग घेऊन प्रचार व प्रसाराचे कार्य करणाऱ्या विविध संस्था व व्यक्तींचा अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला. त्यावेळी मार्गदर्शन करताना प्रा. वारे यांनी बोलत होते.

कार्यक्रमास ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मानव कांबळे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, बानाईचे विजय कांबळे, चंद्रकांत पाटील, रयत विद्यार्थी विचार मंचाचे धम्मराज साळवे यांच्यासह विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते.

**संविधानाची प्रामाणिक अंमलबजावणी गरजेची**

प्रा. वारे म्हणाले, की संविधानाची प्रामाणिक अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. त्यातूनच समाज सुधारक आणि महापुरुषांना अपेक्षित असलेले राष्ट्र निर्माण होईल. तसेच, सर्वांना समान हक्क अधिकार प्राप्त होऊन विकासाची संधी देखील त्यातून निर्माण होईल. यासाठी आधी हे संविधान आपण स्वतः समजून घेऊन ते इतरांना समजावून सांगण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

मानव कांबळे म्हणाले, की महापालिकेसोबतच शहरातील नागरिकांनीही संविधान चळवळीला व्यापक स्वरूप देण्यासाठी उत्स्फुर्तपणे पुढे आले पाहिजे. विजय कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. संतोष शिंदे यांनी आभार मानले.

Pimpri Edition
Dec 2, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

## दिनांक ३० नोव्हेंबर २०२२
## संविधान संवाद अभियान समारोप

# 'संविधान संवाद'चा कार्यक्रमांद्वारे समारोप

**पिंपरी, ता. १ :** महापालिकेतर्फे संत तुकारामनगर येथील आचार्य अत्रे रंगमंदिरात आयोजित संविधान संवाद अभियानाच्या समारोप झाला. पथनाट्य, गीत सादरीकरण, शाळा, महाविद्यालये, धार्मिक स्थळे, महत्त्वाचे चौक, विद्यार्थी व नागरिकांसोबत संवाद साधून संविधानाचे महत्त्व पटवून देण्यात आले.

संविधानाचा प्रचार व प्रसाराचे कार्य करणाऱ्या विविध संस्था आणि व्यक्तींचा अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप यांच्या हस्ते प्रशस्तिपत्र देऊन सन्मान केला. प्रा. सुभाष वारे, सामाजिक कार्यकर्ते मानव कांबळे, बानाईचे विजय कांबळे, चंद्रकांत पाटील, रयत विद्यार्थी विचार मंचचे धम्मराज साळवे, संतोष शिंदे, भाग्यश्री आखाडे, लोकराजा शाहू संवाद प्रशिक्षण केंद्राचे सुनील स्वामी आदी उपस्थित होते. लोककला, पीपीटी, गाणी, गप्पा, गोष्टी आणि चालता बोलता संविधान अशा अनेक माध्यमातून संविधानाच्या प्रास्ताविकेत नमूद सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य या शब्दांचा अर्थ समजावून सांगून जनजागृती केली.

प्रा. वारे म्हणाले, "संविधानाची प्रामाणिक अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. त्यातूनच समाजसुधारक आणि महापुरुषांना अपेक्षित राष्ट्र निर्माण होईल. सर्वांना समान हक्क अधिकार प्राप्त होऊन विकासाची संधीही निर्माण होईल. यासाठी संविधान समजून घेऊन ते इतरांना समजावून सांगण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा." उपक्रमात शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था, विविध मंडळांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. विजय कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. संतोष शिंदे यांनी आभार मानले.



# महापरिनिर्वाण दिनानिमित्त आज विविध कार्यक्रम

पिंपरी, दि. ५ (प्रतिनिधी) - डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शहरात विविध संस्था आणि संघटनांच्या वतीने रक्तदान शिबिर, मार्गदर्शन, अन्नदान आदी कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. तसेच पिंपरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात पूर्वसंध्येला आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

पिंपरी येथील डॉ. आंबेडकर पुतळा परिसरात महापरिनिर्वाण दिनाच्या पूर्वसंध्येला विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यागमूर्ती माता रमाई स्मारक समितीच्या वतीने दीप प्रज्वलन करून अभिवादन करण्यात आले. समितीच्या वतीने सकाळी ७ वाजता पुष्पहार अर्पण करण्यात येणार आहे. भारतीय बौद्ध महासभा व समता सैनिक दलाच्या वतीने अभिवादन व मानवंदना देण्यात येणार आहे. त्यानंतर गीत गायनाचा कार्यक्रम होणार आहे. सायंकाळी ॲड. सर्वजीत बनसोडे यांचे व्याख्यान होईल व गीत गायनाचा कार्यक्रम होणार आहे. समता सैनिक दलाच्या वतीने रक्तदान शिबिर घेण्यात येणार आहे. तर, रयत विद्यार्थी मंचाच्या वतीने वही पेन संकलन करण्यात येणार आहे. श्रीजा फाउंडेशनच्या वतीने अन्नदान करण्यात येणार आहे.

दापोडी येथील धम्मचक्र प्रवर्तन महाविहारात सकाळी ११ वाजता धम्मचारी अमृतसिद्धी यांचे 'आज माझा नवीन जन्म होत आहे, असे मी मानतो' या विषयावर प्रवचन होणार आहे. त्यापूर्वी महाविहार परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात येणार आहे. तसेच बुद्धवंदना आणि विविध कार्यक्रम होणार आहेत. हा कार्यक्रम त्रिरत्न बौद्ध महासंघ, दापोडीच्या वतीने घेण्यात येणार आहे.

दिनांक ०६ डिसेंबर २०२२
























## दिनांक ०६ डिसेंबर २०२२
## एक वही एक पेन अभियान

डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त एक वही एक पेन अभियान पिंपरी भीमसृष्टी येथे राबवण्यात आले.

शोषित, पिडीत, वंचित घटकांच्या न्याय हक्कासाठी सदैव तत्पर असणारं आपल हक्काच

# रिपब्लिकन आवाज न्युज

बातम्या ! विश्लेषण ! बरच काही

संपादक :- अमोल एल. डंबाळे

**Web : www.republicanaawajnews.com बातम्या साठी संपर्क 9028633644 Digital**

**वही, पेन,पुस्तके संकलन अभियानाच्या माध्यमातून जमा झालेले शैक्षणिक साहित्य हे पिंपरी चिंचवड शहरातील गरजू विद्यार्थ्यांना मोफत दिले जाते**

# रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने वही पेन संकलन अभियानास उस्फुर्त प्रतिसाद



**भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 66 व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने वही पेन संकलन अभियानास उस्फुर्त प्रतिसाद**

पिंपरी : ( प्रतिनिधी, अल्ताफ शेख ) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणायचे तुमच्याकडे 2 रुपये असतील तर 1 रुपयाचे पुस्तक घ्या व 1 रुपयाची भाकर घ्या पुस्तक तुम्हाला कसे जगायचे हे शिकवेल व भाकर तुम्हाला जगण्यास मदत करेल." डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या याच शैक्षणिक विचारांचा आदर्श घेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 66 व्या महापरिनिर्वाण दिनी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने भिमसृष्टी स्मारक पिंपरी येथे बाबासाहेबांना अपेक्षित अभिवादन करण्यासाठी वही पेन पुस्तके संकलन अभियान राबवण्यात आले. पिंपरी भिमसृष्टी स्मारक येथे सकाळी 10 ते सायंकाळी 10 पर्यंत वही पेन पुस्तके संकलन अभियान राबविण्यात आले.या अभियानाच्या माध्यमातून 96.5 डझन वह्या,50 डझन पेन,6 डझन पेन्सिल साहित्य जमा झाले तसेच आर्थिक स्वरूपात 4 हजार रुपये आर्थिक मदत जमा झाली. या उपक्रमास पिंपरी चिंचवड शहर परिमंडळ.1 पोलीस उपायुक्त मा.विवेक पाटील सर,माजी.नगरसेविका सुलक्षणा शिलवंत- धर, माजी.नगरसेविका निकिता कदम या अनेक मान्यवरांनी सहभाग घेऊन वही पेन दान देऊन या उपक्रमात सहभाग घेतला. वही, पेन,पुस्तके संकलन अभियानाच्या माध्यमातून जमा झालेले शैक्षणिक साहित्य हे पिंपरी चिंचवड शहरातील गरजू विद्यार्थ्यांना मोफत दिले जाणार आहे.तरी ज्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची गरज आहे त्यांनी संस्थेच्या www.Rayatvvm.org वेबसाईटला भेट देऊन संपर्क साधावा.अथवा संस्थेचे प्रदेश महासचिव संतोष शिंदे यांच्या 9604683459 या क्रमांकावर संपर्क साधावा.. वही पेन संकलन करण्याकरिता करिता रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे,प्रदेश महासचिव संतोष शिंदे,राज्य सचिव निरज भालेराव,राज्य संघटक रोहित कांबळे,राज्य सहसचिव भाग्यश्री आखाडे,पुणे जिल्हा उपाध्यक्ष महेश गायकवाड,पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष मयूर जगताप,शहर कार्याध्यक्ष योगेश कांबळे,शहर उपाध्यक्ष समाधान गायकवाड,शहर समन्वयक प्रतिभा बनसोडे,मावळ तालुका प्रमुख अतुल वाघमारे,मावळ तालुका महासचिव विक्रांत शेळके,शहर सदस्य शारदा भोसले, या पदाधिकारी यांनी मेहनत घेतली

दिनांक ०७ डिसेंबर २०२२







दिनांक २३ डिसेंबर २०२२

प्रथम एज्युकेशन संस्था अंतर्गत हमारा गाव, सेकेंड चान्स यांच्या वतीने माता रमाई भीमराव आंबेडकर प्राथमिक शाळा ,अजिंठानगर येथे आयोजित विज्ञान आणि गणित प्रदर्शन कार्यक्रमाचे उदघाटन रयत विद्यार्थी विचार मंच संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत प्रदर्शन पाहणी केली.


रयत विद्यार्थी विचार मंच
महाराष्ट्र राज्य


रयत विद्यार्थी विचार मंच


रयत विद्यार्थी विचार मंच
महाराष्ट्र राज्य
५ वा
वर्धापन
दिन सोहळा
www.rayatvvm.org










## दिनांक २५ डिसेंबर २०२२
## ५ वा वर्धापन दिन

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचा ५ वा वर्धापन दिन ज्ञानजोती सावित्रीमाई फुले स्मारक सभागृह पिंपरी येथे साजरा करण्यात आला. वर्धापन दिनानिमित्त सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक, उद्योग क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून वर्धापन दिनानिमित्त संस्थेच्या कार्यास शुभेच्छा दिल्या. यावेळी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे सर्व महाराष्ट्रातील पदाधिकारी सदस्य उपस्थित होते.






रयत विद्यार्थी विचार मंच
महाराष्ट्र राज्य
५ वा
वर्धापन


महाराष्ट्र राज्य
वर्धापन






रयत विद्यार्थी विचार मंच
महाराष्ट्र राज्य
५ वा
वर्धापन






## दिनांक २५ डिसेंबर २०२२
## ५ वा वर्धापन दिन

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचा ५ वा वर्धापन दिन ज्ञानजोती सावित्रीमाई फुले स्मारक सभागृह पिंपरी येथे साजरा करण्यात आला. वर्धापन दिनानिमित्त सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक, उद्योग क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून वर्धापन दिनानिमित्त संस्थेच्या कार्यास शुभेच्छा दिल्या. यावेळी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे सर्व महाराष्ट्रातील पदाधिकारी सदस्य उपस्थित होते.


Thank you